बाब क्र.१

अधिसभा - १२ व १३ मार्च, २०२१

# मुंबई विद्यापीठ

## दिनांक २५ ऑगस्ट, २०२० रोजी

## दुपारी १:०० वाजता

## (द्रुकश्राव्य बैठक)

# मुंबई विद्यापीठ

**मसुदा** **अधिसभा**

क्र. १/२०२०-२१ दिनांक : २५ ऑगस्ट,२०२०

अधिसभेची वार्षिक सभा मंगळवार दिनांक २५ ऑगस्ट, २०२० रोजी दुपारी ०१.०० वाजता सुरु झाली. कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर उद्भवलेल्या परिस्थितीमुळे सदर सभा क्लाऊड दृकश्राव्य बैठक (zoom App) द्वारे घेण्यात आली. सदर बैठकीस खालील मान्यवर सभासद उपस्थित होते :-

सभेमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे ६९ सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | उपस्थित |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरू) | उपस्थित |
| ३. | प्रा. (डॉ.) राजेश खरात | उपस्थित |
| ४. | प्रा. (डॉ.) अनुराधा मजुमदार | उपस्थित |
| ५. | प्राचार्य (डॉ.) अजय भामरे | उपस्थित |
| ६. | प्राचार्य (डॉ.) अनिता आनंद मोहन स्वामी | उपस्थित |
| ७. | डॉ. विनोद पाटील | उपस्थित |
| ८. | डॉ. माधवी इंगोले (प्रभारी वित्त व लेखा अधिकारी) | उपस्थित |
| ९. | प्राचार्य (डॉ.) किशोर सुखटणकर | उपस्थित |
| १०. | डॉ. सुनिता मगरे | अनुपस्थित |
| ११. | डॉ. समीर कुलकर्णी | उपस्थित |
| १२. | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | उपस्थित |
| १३. | संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय नामनिर्देशित सदस्य | अनुपस्थित |
| १४. | श्री. भुजंग की. अहिरे | उपस्थित |
| १५. | डॉ. सुनिल पाटील | उपस्थित |
| १६. | डॉ. मोहन अमरूले | उपस्थित |
| १७. | डॉ. दिलीप एस. पाटील | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| १८. | प्राचार्य (डॉ.) विठ्ठल सुबराव शिवणकर | उपस्थित |
| १९. | प्राचार्य शाम रघुनाथ जोशी | अनुपस्थित |
| २०. | प्राचार्य (डॉ.) तुषार मनोहर देसाई | उपस्थित |
| २१. | प्राचार्य (डॉ.) नागेंद्रनाथ बेचनपांडे | उपस्थित |
| २२. | प्राचार्य (डॉ.) अनुजा नारायण पळसुलेदेसाई | उपस्थित |
| २३. | प्राचार्य विठ्ठल बळीराम रोकडे | उपस्थित |
| २४. | प्राचार्य (डॉ.) महादाप्पा गंगाराम गोंडा | उपस्थित |
| २५. | प्राचार्य धनाजी शंकर गुरव | उपस्थित |
| २६. | श्री. हृषिकेश गजानन पोळ | उपस्थित |
| २७. | श्री. संजय बाबूराव शेटे | उपस्थित |
| २८. | ॲड. निल गिरीश हेळेकर | उपस्थित |
| २९. | श्री. हसमुख देवजी रांभिया | उपस्थित |
| ३०. | श्रीमती शिल्पा शशिकांत पटवर्धन | उपस्थित |
| ३१. | डॉ. सुभाष कृष्णा वाघमारे | उपस्थित |
| ३२. | प्रा. वैभव एकनाथ नरवडे | उपस्थित |
| ३३. | डॉ. अनंत नाना लोखंडे | उपस्थित |
| ३४. | प्रा. चंद्रशेखर सदानंद कुलकर्णी | उपस्थित |
| ३५. | डॉ. निशा मनोज मुनी | उपस्थित |
| ३६. | श्री. मोहम्मद ताहीर | उपस्थित |
| ३७. | डॉ. गुलाबराव बापू राजे | उपस्थित |
| ३८. | श्री. रविकांत बालकृष्ण सांगुर्डे | उपस्थित |
| ३९. | डॉ. रविंद्रनाथ सोन्याबापू रसाळ | उपस्थित |
| ४०. | श्री. प्रकाश दामोदर दातार | उपस्थित |
| ४१. | डॉ. आरती प्रसाद | उपस्थित |
| ४२. | डॉ. सुरेश नामदेव मैंद | उपस्थित |
| ४३. | डॉ. संगिता निवृत्ती पवार | उपस्थित |
| ४४. | डॉ. मृदूल जगन्नाथ निळे | उपस्थित |
| ४५. | श्री. महादेव बाबुराव जगताप | उपस्थित |
| ४६. | श्री. प्रदीप बाळकृष्ण सावंत | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४७. | श्री. प्रविण महादेव पाटकर | उपस्थित |
| ४८. | डॉ. सुप्रिया गजानन करंडे | उपस्थित |
| ४९. | श्री. मिलिंद हरीश्चंद्र साटम | उपस्थित |
| ५०. | सौ. शितल स्वप्निल शेठ-देवरूखकर | उपस्थित |
| ५१. | श्री. निखिल यशवंत जाधव | उपस्थित |
| ५२. | डॉ. धनराज नीळकंठ कोहचाडे | उपस्थित |
| ५३. | श्री. शशिकांत काशिनाथ झोरे | उपस्थित |
| ५४. | श्री. राजन वसंत कोळंबेकर | उपस्थित |
| ५५. | श्री. मंदार सावंत-देसाई | उपस्थित |
| ५६. | श्री. रविंद्र प्रभुदेसाई | अनुपस्थित |
| ५७. | श्री. धनेश सावंत | उपस्थित |
| ५८. | श्री. जहांगीर सेथना | अनुपस्थित |
| ५९. | प्रा. डी. पी. मेहता | उपस्थित |
| ६०. | ॲड. वैभव थोरात | उपस्थित |
| ६१. | फादर मॅगी मुर्झेलो | उपस्थित |
| ६२. | श्री. दिपेश मेहता | अनुपस्थित |
| ६३. | श्री. राजीव काशिकर | अनुपस्थित |
| ६४. | श्री. सुधाकर तांबोळी | उपस्थित |
| ६५. | श्री रूपेश मालुसरे | उपस्थित |
| ६६. | श्री. साहेबराव घुले | उपस्थित |
| ६७. | ॲड. अनिल परब (वि.प.स.) | अनुपस्थित |
| ६८. | श्रीमती स्वरूपा साळवी | अनुपस्थित |
| ६९. | डॉ. विनोद पाटील (कुलसचिव) | उपस्थित |

**श्रद्धांजली** :

**माननीय कुलसचिवांनी महाराष्ट्रातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व कला इत्यादी क्षेत्रातील अनेक नामवंत व्यक्तींचे निधन झाल्यामुळे समाजाचे व विद्यापीठाचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे, असे निवेदन केले.** श्री. प्रणव मुखर्जी, डॉ. पी. आर. दुभाषी, श्री. सुहास लिमये, प्रार्चाय डॉ.राजपाल हांडे, श्री केशवानंद भारती, श्रीमती मंगला विधाते, डॉ. गोविंद स्वरूप, श्रीमती मीना देशपांडे, स्वामी अग्निवेश, श्री. माधव कोंडविलकर, श्री. रघुवंश प्रसाद सिंह, श्रीमती कपिला वात्स्यायन, श्रीमती ललिता देसाई तथा आशू, कॉ. रोझा देशपांडे, सरदार तारा सिंग, डॉ. भाऊ लोखंडे, श्रीमती आशालता वाबगांवकर, श्री. राजेंद्र देवळेकर, श्री सुरेश अंगडी, श्रीमती सरोज सुखटणकर, श्री. भुपेश पंडया, डॉ. शेखर बसू, श्री. एस.पी. बालसुब्रमण्यम, रामदास महाराज जाधव, श्री. जसवंत सिंह, भागवताचार्य वा.ना.उत्पात, प्रा.पुष्पा भावे, श्री. अविनाश खर्शीकर, श्री. रामविलास पासवान, संदेश कोडविलकर, श्री. अनिकेत ओव्हाळ, श्री. सौमित्र चॅटर्जी, श्री. तरूण गोगाई, श्री. अहमद पटेल, श्री. रवी पटवर्धन, श्री. विष्णू सावरा, श्री. शंकर खंचनाळे, श्री. रवी पटवर्धन, श्री. धर्मपाल गुलाटी, श्री. नरेद्र भिडे, श्री. माधव गो. वैद्य, श्री. मोतीलाल व्होरा, कर्नल नरेंद्र बुल कुमार, डॉ. भा. रा. अंधारे, श्रीमती मंगला भावे, श्री. विलास काका उंडाळकर, श्री. अशोक म्हात्रे, अख्तर अली, पंढरपुरचे महाराज प.पु. श्री. मुरलीधर धुत, वेदांतचार्य **या सर्व महान व्यक्तींनी देशासाठी व विविध संस्थांसाठी अनमोल योगदान दिले असल्याचे सांगितले.**

**तसेच विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.अजय देशमुख व श्री. सुधाकर गोसावी, उपकुलसचिव व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या निधनाबाबत कुलगुरु यांनी सभागृहात दुख: व्यक्त केले.**

**वरील सर्व मान्यवरांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहात शोक व्यक्त करून सर्व दिवंगतांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.**

**स्वागत** :

**माननीय कुलगुरू यांनी डॉ. अनिता आनंद मोहन स्वामी यांचे कलम २८(२)(ड) अन्वये अधिष्ठाता पदावर नामनिर्देशन झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन व स्वागत केले व त्यांच्याकडून विद्यापीठाला मार्गदर्शन होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.**

**कुलसचिव यांनी विद्यापीठाचे मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू आणि सर्व सन्मानीय सदस्यांचे स्वागत केले आणि माननीय कुलपती यांच्या निर्देशान्वये मा. कुलगुरूंना सभेचे अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली.**

**अभिनंदन :**

माननीय कुलगुरूंनी असोसिएशन ऑफ कॉमनवेल्थ युनिव्हर्सिटीज लंडनच्या गव्हर्निंग काऊंसिलमध्ये त्यांची निवड झाल्याची सविस्तर माहिती दिली. प्रा. वैभव नरवडे यांनी या निवडीमुळे मा. कुलगुरूंना आपल्या देशाचे प्रतिनिधित्व आंतरराष्ट्रीय स्तरावर करता येणार आहे; आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगल्या रीतीने समन्वय आणि अधिक संशोधन पुढे कसे नेता येईल यासंबंधी विचारमंथनात सहभागी होता येणार असल्याने मा. कुलगुरूंच्या अभिनंदनाचा प्रस्ताव त्यांनी मांडला आणि ॲड. निल हेळेकर यांनी त्याला अनुमोदन दिले.

माननीय कुलगुरूंचे सर्व सदस्यांनी वैयक्तिकरित्या हार्दिक अभिनंदन केले.

सभेच्या प्रारंभी माननीय कुलगुरूंनी सर्व सदस्यांचे स्वागत केले व सदस्यांना ऑनलाईन बैठकीसंदर्भात मार्गदर्शन केले.

माननीय कुलगुरूंनी कोविड संकटामुळे बदललेल्या परिस्थितीचा आढावा घेतला आणि शैक्षणिक क्षेत्रावर आलेल्या संकटावर एकत्रितपणे मात करण्याचे आवाहन केले; रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात झालेल्या वादळाचा आढावा घेतला आणि विद्यापीठाने केलेल्या मदतीची माहिती दिली. बदललेल्या परिस्थितीत ऑनलाइन शिक्षण, मिश्र शिक्षण पद्धती आणि संकरीत शिक्षण पद्धतीसाठी तज्ञांची मदत आणि आर्थिक सहाय्य मिळावे म्हणून केलेले प्रयत्न यांची माहिती त्यांनी दिली. तसेच Centre of Excellence in Maritime Studies तसेच Centre for International Relation and Stratagic Studies आणि Dr. Babasaheb Ambedkar International Research Centre यांची माहिती दिली. विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांच्या संकेतस्थळाचे उद्घाटन प्रसिद्ध शास्त्रज्ञ काकोडकर यांनी केले तसेच ऑनलाइन व्यवसाय मार्गदर्शन आणि लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने दोन अध्यासन सुरू करत असल्याची माहिती त्यांनी सभागृहाला दिली.

कोविड काळात विद्यापीठात काम करताना येणाऱ्या असंख्य अडचणींचा आढावा घेतला आणि येस बँकेतील विद्यापीठाच्या ठेवीसंबंधी झालेल्या गोंधळाची चौकशी, समितीने चांगल्या रीतीने पार पाडली असल्याचे त्यांनी सांगितले.

**विद्यापीठाची उल्लेखनीय कामगिरी :**

१) देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या यादीत मुंबई विद्यापीठाने स्थान पटकावले असून पहिल्या शंभर विद्यापीठांच्या क्रमवारीत मुंबई विद्यापीठ ६५ व्या स्थानावर पोहचले आहे, तर महाराष्ट्रातील पारंपारिक राज्य विद्यापीठांच्या यादीत

दुसऱ्या क्रमांकावर आहे. राष्ट्रीय संस्थात्मक नामांकन (एनआयआरएफ) रँकिंगमध्ये मुंबई विद्यापीठाची कामगिरी सुधारली असून मागील वर्षी मुंबई विद्यापीठ ८१ व्या स्थानावर होते.

२) देशासह राज्यात उद्भवलेल्या कोरोनाच्या संकटकालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाच्या प्रयत्नांना साथ देण्यासाठी मुंबई विद्यापीठाने पुढाकार घेतला असून शासनास सर्वोतोपरी मदत करण्यास विद्यापीठाने तयारी दर्शविली असून तशा आशयाचे पत्र मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना लिहले आहे. कोरोना बाधीत व संक्रमित व्यक्तींच्या विलगीकरणासाठी विद्यापीठाच्या ताब्यातील वसतिगृहे, गेस्ट हाऊसेस, आयटी-पार्क इमारत, भाषा भवन इमारतीची जागा विलगीकरणासाठी उपलब्ध करुन दिली आहे.

३) कोरोना विषाणूच्या प्रादुर्भामुळे एकीकडे सर्वसामान्यांना संसर्गाचा धोका संभवतो, त्याचबरोबर कोरोना रुग्णांची सुश्रुषा करणाऱ्या वैद्यकिय सेवेतील डॉक्टर्स, परिचारिका आणि कर्मचाऱ्यांनाही याची बाधा झाल्याचे दिसून आले आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ.विश्वनाथ पाटील आणि स्वच्छ उर्जा अलाएन्सचे डॉ. सुनील पेशणे व त्यांचा एक विद्यार्थी रोशन राणे यांनी एकत्र येऊन पीपीई कीट आणि एन-९५ मास्कवर जमा होणारे कोरोना विषाणू नष्ट करण्यासाठी नॅनो तंत्रज्ञानावर आधारीत विषाणूनाशक लेप (अँटीव्हायरल 'कोटींग्स') तयार केली आहेत. विशिष्ट प्रकारच्या पॉलिमर्समध्ये नॅनो पार्टीकल्स बनवून त्याची लेप/पापुद्रे तयार करण्यात आली आहेत.

४) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२९ व्या जयंतीनिमित्त मुंबई विद्यापीठाने 'संभाषण' या आंतरविद्याशाखीय द्विभाषिक ऑनलाईन नियतकालिकाला सुरुवात केली असून महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर हे नियतकालिक प्रसिद्ध करण्यात आले आहे. या आंतरविद्याशाखीय नियतकालिकाच्या माध्यमातून विभिन्न विद्याशाखांमध्ये समकालिन प्रश्नांबाबत टीकात्मक चर्चा आणि सखोल विचारमंथनाद्वारे संवाद प्रस्थापित होण्याच्या दृष्टिकोनातून मुंबई विद्यापीठाने हा अभिनव उपक्रम हाती घेतला असून मानव्यविद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा.राजेश खरात यांच्या संकल्पनेतून या नियतकालिकाची सुरूवात करण्यात आली आहे.

५) राज्य शासनाच्या पुढाकाराने मुंबई विद्यापीठाने सुरू केलेल्या महाविद्यालयांच्या शैक्षणिक परिक्षणासाठी विद्यापीठाने माहितीचे ऑनलाईन संकलन केले आहे. सुमारे ४०० हून अधिक महाविद्यालये आणि संस्थांनी माहिती भरली असून ही माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२९ व्या जयंतीचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठात **'डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल रिसर्च सेंटर'** हे नवे संशोधनकेंद्र येत्या शैक्षणिक वर्षापासून (२०२०-२०२१) सुरु केले असून त्यासाठी मुंबई विद्यापीठाने रुपये १ कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे. तसेच इंग्लंड मधील आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेतील दक्षिण आशियाई केंद्रात डॉ. 'बाबासाहेब आंबेडकर व्हिजिटींग फेलो' या उपक्रमासाठी महाराष्ट्र शासनाने देखील रुपये १८ कोटींची तरतूद केलेली आहे.

७) कोरोनामुळे उद्भवलेल्या संकटकालीन परिस्थितीत सामाजिक बांधिलकी जपत मुंबई विद्यापीठाने महत्वाचे पाऊल उचलून कम्युनिटी किचनला सुरूवात केली. 'कम्युनिटी किचन' या संकल्पनेअंतर्गत विद्यापीठाने शासनाच्या सहकार्यातून दररोज ५०० हून अधिक गरजू लोकांच्या दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती.

८) कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाने पुढाकार घेऊन कोव्हिड १९ च्या उद्रेकाच्या मानसिक परिणामास सामोरे जाण्यासाठी विद्यापीठाच्या उपयोजित मानसशास्त्र विभागाने ऑनलाइन मानसिक आरोग्य सहाय्य सेवा उपलब्ध करुन दिली आहे. विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. विवेक बेल्हेकर यांच्या पुढाकाराने ही ऑनलाईन समुपदेशनाची संकल्पना राबवली आहे.

९) मुंबई विद्यापीठाने तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पूर्वनियोजित शॉर्ट-टर्म कोर्सेस रद्द न करता त्याचे यशस्वी आयोजन करून नविन पायंडा पाडला आहे. मुंबई विद्यापीठात १२ ते १८ मार्च २०२० दरम्यान युजीसी-एचआरडीसी मार्फत शिक्षकांसाठी शॉर्ट-टर्म कोर्सेसचे आयोजन केले होते. मात्र देशासह राज्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनामार्फत निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन करत विद्यापीठाने हे पूर्वनियोजित कार्यक्रम रद्द न करता तंत्रज्ञानाच्या सहाय्याने त्याचे यशस्वी आयोजन केले. ***गुगल मीट*** या एप्लीकेशनच्या माध्यमातून विद्यापीठाने या कार्यक्रमातील सहभागी आणि मार्गदर्शक दोघांना ऑनलाईन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून या सत्राचे नियोजन केले.

१०) टाळेबंदीच्या काळात अध्ययन-अध्यापन पद्धतीमध्ये खंड पडू नये यासाठी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मुंबई विद्यापीठाने पहिल्यांदाच पीएचडी शिक्षणक्रमासाठी ऑनलाईन मौखिक परीक्षेचे (viva voce) यशस्वी आयोजन केले. चारही विद्याशाखेतील विविध विषयांतर्गत विद्यापीठाने ५० हून अधिक ऑनलाईन पीएचडीचे viva voce घेतले.

११) मुंबई विद्यापीठाच्या सर्व आजी-माजी विद्यार्थ्यांना एकसंघ करण्याच्या हेतूने विद्यापीठाने 'मुंबई विद्यापीठ माजी विदयार्थी संघ' स्थापन केला असून यासाठी विद्यापीठाने अद्ययावत संकेतस्थळ तयार केले आहे. या संकेतस्थळाचे अनावरण जागतिक किर्तीचे ख्यातनाम अणूशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

१२) कोव्हिड-१९ या साथरोगाचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे परिणाम प्रशासकीय कामकाजावर जाणवू लागले आहेत. भविष्यातही याचे दृश्य परिणाम जाणवू लागतील. त्यामुळे पुढील येणाऱ्या काळाला समोरे जाण्यासाठी प्रशासकीय कामकाजाच्या पद्धतीमध्ये त्यानुरुप बदल करण्याच्या अनुषंगाने दैनदिन प्रशासनात अधिकाधीक तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रशासन अधिक गतिमान करण्यासाठी विद्यापीठाने विद्यापीठातील प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी 'कॅपेसिटी बिल्डींग प्रोग्राम फॉर एडमिनीस्ट्रेटर्स' या विषयावर दोन दिवसीय ऑनलाईन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते.

१३) निसर्ग चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील १५ महाविद्यालयांसाठी मुंबई विद्यापीठाने मदतीचा हात पुढे केला आहे. विद्यापीठाच्या आपत्ती व्यवस्थापन निधीतून या महाविद्यालयांना रुपये ५६ लाखांची आर्थिक मदत दिली.

१४) मुंबई विद्यापीठाच्या मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पब्लिक पॉलिसी (आधीचे अर्थशास्त्र विभाग) विभागात लवकरच अर्थशास्त्रातील संशोधन केंद्र स्थापन होणार आहे. यासाठी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी तथा युटीआयचे माजी अध्यक्ष डॉ. एस. ए. दवे यांनी रुपये ५ कोटीची देणगी देऊ केली आहे. या संशोधन केंद्राअंतर्गत वित्तीय बाबींशी निगडीत विविध विषयांवर संशोधन केले जाणार आहे. नुकत्याच या विभागाने १ ऑगस्ट रोजी आपला १०० वा वर्धापन दिन साजरा केला. याप्रसंगी विभागामार्फत विभागातील माजी विद्यार्थी तथा राज्यसभा खासदार आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. नरेंद्र जाधव यांचे "इंडस्ट्रीअल रिवॉल्युशन ४: ग्लोबल पब्लीक पॉलिसी इश्यूज इन इकोनॉमी अँड नेशनल सिक्यूरिटी" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

१५) पदवी, पदव्युत्तर आणि पदविका अभ्यासक्रमांचे शिक्षण घेतल्यावर उपलब्ध असलेल्या नोकरीच्या संधी, तसेच परदेशी शिक्षणासाठी उपलब्ध असलेले विविध पर्यायांबाबत जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना करीअर कॉऊन्सलींगसाठी मुंबई

विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. यासाठी विद्यापीठाने संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करुन दिली असून याद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या करीअरबद्दल ऑनलाईन समुपदेशन केले जाणार आहे.

१६) कोव्हिड-१९ या साथरोगाच्या काळात गणेशोत्सव आणि इतर सणासुदीच्या दरम्यान लोकांमध्ये आरोग्य आणि इतर अनुषंगिक बाबींची काळजी घेण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी स्थानिक प्रशासनासोबत एकत्रितरित्या काम करून सहकार्य करण्यासाठी आभासी पद्धतीने वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण श्री उदय सामंत यांनी या कार्यक्रमाचे उदघाटन केले.

१७) मुंबई विद्यापीठात लवकरच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या नावे अध्यासन केंद्र स्थापन केले जाणार आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई विद्यापीठ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ही घोषणा करण्यात आली. राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले होते.

१८) कोविड-१९ च्या संकट काळात रक्ताचा तुटवडा भासायला सुरुवात झाली आहे. काही शिबिरे रद्द करण्यात आली. रक्तपेढीत जाऊन रक्तदान करणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. यामुळे रक्ताची आवश्यकता असणाऱ्या रूग्णांना अनेक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. या सर्व बाबी लक्षात घेऊन मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या वतीने रक्तदान वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन विविध महाविद्यालयांच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांना करण्यात आले होते. टाळेबंदी सुरू झाल्यापासून आतापर्यंत ५ विविध ठिकाणी रक्तदान शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते.

१९) कोरोनामुळे उद्भवलेल्या संकटकालीन परिस्थितीत मुंबई विद्यापीठाने सामाजिक बांधिलकी जपत मदतीचा हात पुढे केला आहे. आदिवासी आणि बिगर आदिवासी गरीब कुटुंबाना दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या जीवनावश्यक वस्तू आणि अन्नधान्यांचा पुरवठा करण्यासाठी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी पुढे सरसावले आहेत. जवळपास १०० हून अधिक विद्यापीठ अधिकाऱ्यांनी त्यांच्या वैयक्तिक योगदानातून जवळपास १ लाख रुपये गोळा करून या गरिब आणि आदिवासी कुटुंबासाठी अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंची सोय करुन दिली आहे. या सेवाभावी उपक्रमाअंतर्गत आतापर्यंत रायगड, पालघर आणि ठाणे जिल्ह्यातील ३१४ आदिवासी कुटुंब आणि १५५ बिगर आदिवासी कुटुंबांना मदत करण्यात आली आहे

२३) ७ ऑगस्ट पासून ऑनलाईन लेक्चर्सच्या माध्यमातून भरविण्यात येणाऱ्या वर्गात विद्यार्थ्यांना कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो, विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर निर्माण होणाऱ्या संभाव्य अडचणी जाणून घेऊन त्यांच्या शंकाचे निरसन करण्यासाठी कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. विद्यार्थी संवाद उपक्रमाअंतर्गत ऑनलाईन पद्धतीने आयोजित केलेल्या या उपक्रमात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुमारे ३५ महाविद्यालयातील २५० हून अधिक विद्यार्थी या उपक्रमांत सहभागी झाले होते. ग्रामीण आणि दुर्गम भागात काही ठिकाणी अपुऱ्या इंटरनेट कनेक्टीव्हिटीमुळे ऑनलाईन लेक्चर्सची थेट सुविधा उपलब्ध होत नसल्याने रेकॉर्डेड लेक्चर्सच्या स्वरुपात लेक्चर्स उपलब्ध करून देणे, प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिके शक्य नसल्याने त्याच्या स्वरूपात काही अंशी बदल करणे, कोव्हीडमुळे उद्भवलेल्या संकटकालीन परिस्थितीमुळे आर्थिक विवंचनेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शूल्क भरण्यास सवलत देणे, परिक्षांचे नियोजन असे विविध प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केले असता त्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे आणि शंकांचे समाधान करण्यात आले.

श्री. रविकांत सांगुर्डे, प्राचार्य मोहम्मद ताहीर, प्रा. मृदुल निळे, श्री. सुधाकर तांबोळी आणि डॉ. गुलाबराव राजे यांनी सर्वांना योग्य वेळी बोलता यावे यासाठी सर्वांनी ऑडिओ सशब्द ठेवावे, असे सुचविले. ऑनलाइन सभेसाठी घ्यावयाची दक्षता आणि काळजी यासंबंधीही सूचनाही त्यांनी दिल्या.

विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी उच्च शिक्षण सचिव बैठकीला उपस्थित राहणार असल्याचे आश्वासन मिळाले असल्याचे प्रकुलगुरूनी सभागृहाला सांगितले.

**श्री. महादेव जगताप** यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित करून विद्यापीठात कोरोना कालावधीत कोणकोणत्या विषयावर बैठका झाल्या यासंबंधी माहिती मागितली. मा. कुलगुरूंनी त्यांना माहिती देण्याचे आश्वासन दिले.

**सौ. शितल शेठ-देवरुखकर** आणि **श्री. प्रदीप सावंत** यांनी येस बँकसंदर्भात सत्यशोधन समितीच्या अहवालासंबंधी सविस्तर माहिती देण्याची मागणी केली व येस बँकेच्या सत्यशोधन समितीच्या अहवालावर चर्चेची मागणी केली व भविष्यकालीन योजनांसंबंधी वेगळी बैठक बोलवावी, अशी विनंती केली. त्यास अनुसरून प्र-कुलगुरूंनी स्पष्ट केले की, सत्यशोधन समितीचा अहवाल अधिसभेसमोर मांडण्यात येईल.

**बाब क्र. १ : दिनांक १२ व १३ मार्च, २०२० रोजी झालेल्या अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त संमत करणे.**

**श्री मिलिंद साटम** यांनी कुलगुरूंचे अभिनंदन करून अधिसभा इतिवृत्त समितीचे अनुभव सांगितले. अतिशय कमी वेळेत सर्वांनी सहकार्याने काम केल्याबद्दल कौतुक केले. तसेच कर्मचाऱ्यांची कमतरता लक्षात घेऊन सर्व काम विद्यापीठातील इतर विभागांतही आउटसोर्स करावे, अशी सूचना केली.

**ॲड. निल हेळेकर** यांनी माननीय कुलगुरूंचे अभिनंदन करून अधिसभा इतिवृत्त समितीच्या सर्व सदस्यांचे आणि सौ. संजना सावंत, सहायक कुलसचिव यांचे कौतुक केले. सर्व समिती सदस्यांनी अतिशय मेहनत आणि कष्टाने वेळेवर आणि काळजीपूर्वक काम पूर्ण केल्याचे सांगितले. अधिसभा मिनिट्स ही गोपनीय असल्यामुळे बाहेर टंकलेखनास देणे योग्य होणार नाही असे सांगितले आणि टंकलेखन संबंधी दुरुस्ती अथवा सूचना असल्यास कळवावे, अशी विनंती केली.

**श्री. राजन कोळंबेकर** यांनी अधिसभेचे इतिवृत्त वाचायला वेळ मिळाला नसल्याची खंत व्यक्त केली.

**श्री महादेव जगताप** यांनी इतिवृत्त हे सखोल असावेत; त्यामध्ये सर्व गोष्टींचा अंतर्भाव असावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. विद्यापीठ प्रशासनाने बृहत आराखड्याची बाब घेण्यापूर्वी १४० कोटींच्या गुंतवणुकीसंदर्भात वेगळी अधिसभा घेवू असा शब्द दिला होता; त्याबद्दल काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित

केला. १४० कोटींच्या संदर्भात जी समिती गठीत केली होती त्याचा काय अहवाल आहे? याबाबत प्र-कुलगुरू म्हणाले की, बृहत आराखडा हा अधिष्ठाता मंडळामधुन व्यवस्थापन परिषदेतून अधिसभेमध्ये चर्चेला येतो. त्यावर श्री महादेव जगताप म्हणाले की, ही प्रक्रिया आम्हाला माहित आहे; परंतु गुणवत्ता राखण्यासाठी जी समिती गठित केली त्यांनी काय सर्वे केला; कुठल्या विभागात भेटी दिल्या त्याचा अहवाल अधिसभेत का नाही ठेवला? त्याचबरोबर पदवीधर मतदारसंघाचा एकही प्रतिनिधी त्यामध्ये का नाही. वाढीव विद्यार्थी संख्या संदर्भातही जी समिती तयार केली गेली त्यातही पदवीधर मतदारसंघाचा प्रतिनिधी नाही, याबाबत त्यांनी आक्षेप घेतला.

**श्री. महादेव जगताप** यांनी आक्षेप मांडताना नमूद केले की, पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधी विद्यापीठाला मदतीला हवेत; परंतु अशा सगळ्या समित्यांमधून त्यांना दूर ठेवले जाते हा दुजाभाव का? असा प्रश्न महादेव जगताप यांनी उपस्थित केला.

प्र-कुलगुरुंनी त्यावर खुलासा केला की, डिझास्टर मॅनेजमेंट समितीमध्ये पदवीधर मतदार संघाचे प्रतिनिधी आहेत. त्यावर श्री. महादेव जगताप म्हणाले की, डिझास्टर समिती जी गठीत झाली, ती विद्यापीठाची समिती नाही; सह-संचालकांनी अहवाल दिला; त्यावर मला जास्त खोलात जायचे नाही.

**श्री. प्रदीप सावंत** म्हणाले की, आपण प्रथम बृहत् आराखड्यावर बोलले पाहिजे. कुलगुरू म्हणाले बृहत् आराखड्याचे स्वतंत्र सादरीकरण आहे; त्याची जबाबदारी अधिष्ठाता मंडळाची असते; तो अधिष्ठाता मंडळाचा अधिकार आहे.

त्यावर **श्री. महादेव जगताप** यांनी विचारणा केली की, अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत काय चर्चा झाली? त्याचे इतिवृत्त आले आहे का? त्यांनी इतिवृत्ताबद्दल आक्षेप मांडताना सांगितले की, आम्ही सिनेटमध्ये स्थगन प्रस्ताव घेतो; परंतु त्यांच्यावरील कार्यवाही अहवाल हा कुठेच नसतो. त्यावर प्र-कुलगुरू म्हणाले की, कोरोनाच्या परिस्थितीत बराच वेळ विद्यापीठ बंद होते त्यानंतर पंधरा १५% पर्यंत उपस्थिती होती अशा परिस्थितीत इतिवृत्त तयार केले गेले. श्री महादेव जगताप यांनी त्याबद्दल विद्यापीठ प्रशासनाचे अभिनंदन केले.

**श्री. राजन कोळंबेकर** यांनी बृहत आराखड्यासाठी अधिसभेची बैठक ऑक्टोबर ऐवजी दोन महिने अगोदर का घेतली? असा मुद्दा उपस्थित केला. याबद्दल प्र-कुलगुरू म्हणाले की, जुलै, २०१८ मध्येपण बृहत आराखड्यासाठी बैठक झाली होती.

**श्री. महादेव जगताप** यांनी पुढे असे नमूद केले की, येस बँकेतील १४० कोटींच्या गुंतवणुकीसंदर्भात वेगळी बैठक घेऊ; बृहत आराखडासाठी वेगळी बैठक घेऊ असे प्रशासनाने आश्वासन दिले होते; परंतु

प्रशासनाने शब्द पाळला नाही. स्थगन प्रस्ताव मांडले जातात त्याचे योग्य उत्तर मिळत नाही आणि जर विद्यार्थ्यांचे प्रश्न सुटणार नसतील तर अशा बैठकीला काहीच अर्थ उरत नाही.

**ॲड. वैभव थोरात**, श्री प्रदीप सावंत आणि सौ. शितल शेठ-देवरुखकर यांनी कुलगुरूंच्या लक्षात आणून दिले की, गेल्या अधिसभेमध्ये १४० कोटींच्या गुंतवणुकीसंदर्भात वेगळी बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन कुलगुरूंकडून देण्यात आले होते. यासंदर्भात प्र-कुलगुरू यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखवले, त्यामध्ये ॲड. वैभव थोरात यांनी कुलसचिवांना प्रश्न केला होता की, १४० कोटींच्या गुंतवणुकीसंदर्भातचा अहवाल कुठल्या अधिसभेच्या आणि कोणत्या महिन्यात घेण्यात येईल ते कळवा. यावर कुलसचिव यांनी खुलासा केला होता की, येणाऱ्या बृहत् आराखड्यासाठी घेण्यात येणाऱ्या तातडीच्या अधिसभेत सत्यशोधन समितीचा अहवाल ठेवण्यात येईल.

**सौ. शितल शेठ-देवरुखकर** यांनी लक्षात आणून दिले की, जर बृहत आराखड्याच्या मंजुरीसाठी आणि सत्यशोधन समितीसाठी ही तातडीची बैठक असेल तर पुन्हा नोव्हेंबर महिन्यामध्ये सर्वसाधारण दुसरी बैठक घ्यायला हवी. सौ. शितल शेठ-देवरुखकर यांना समर्थन देत श्री. प्रदीप सावंत, श्री. महादेव जगताप, प्राध्यापक कुलकर्णी यांनी, कुलगुरूंनी सर्वसाधारण अधिसभेसाठी नोव्हेंबर महिन्यामध्ये अधिसभा होईल, असे आश्वासन द्यावे असे सांगितले. त्यावर प्राचार्य अजय भामरे यांनी लक्षात आणून दिले की, या सभेसाठी ४० दिवसांची सूचना दिली गेली आहे त्यामुळे ही सर्वसाधारण सभा आहे, तातडीची नाही.

अधिसभा सदस्यांनी पुन्हा एक सर्वसाधारण अधिसभा घेण्यासाठी आग्रह धरला त्यावर कुलगुरूंनी आश्वस्त केले की, सध्या कोरोनाची परिस्थिती असल्यामुळे परिस्थिती बघून अधिसभेबद्दल नोव्हेंबर मध्ये निर्णय घेण्यात येईल. कुलगुरूंनी सभेच्या लक्षात आणून दिले की, सध्या ऑनलाइन टिचिंग आणि ऑनलाईन परीक्षा होणार आहेत की नाही यावर काम सुरु आहे त्यात अधिसभा सदस्यांचे सहकार्य अपेक्षित आहे.

**श्री. महादेव जगताप** आणि **श्री. शशिकांत झोरे** यांनी कुलगुरूंना प्रश्न विचारला की, परीक्षेच्या संदर्भात नक्की निर्णय होत नाही; परंतु विद्यार्थ्यांना व पालकांना आपण काय मार्गदशन करणार आहोत त्याबद्दल आश्वस्त करणे गरजेचे आहे. श्री. सुधाकर तांबोळी यांनी लक्षात आणून दिले की, गेल्या चार-पाच महिन्यांमध्ये विद्यापीठाकडून याबद्दल कुठलेही निवेदन प्रसिद्ध झाले नाही. डॉ. सुप्रिया करंडे यांनी सभेच्या लक्षात आणून दिले की, इतिवृत्त हे विद्यापीठाचे गोपनीय दस्तावेज आहेत त्यामुळे त्याचे आऊटसोर्सिंग होता कामा नये. श्री. धनेश सावंत यांनी देखील या मताला दुजोरा दिला. त्याच बरोबर येथे इतिवृत्तासाठी काम करणाऱ्या समितीची व कार्यकारी प्राधिकरणे विभागाची प्रशंसाही केली.

**प्रा. वैभव नरवडे**, श्री. राजन कोळंबेकर आणि श्री. संजय शेटे यांनी डॉ. सुप्रिया करंडे यांच्या मताला सहमती दर्शवित इतिवृत्त हे आऊटसोर्सिंग होऊ नये तसेच ८० आणि ९० च्या ऐवजी ते ४० ते ५० पानाचे इतिवृत्त बनवावेत, अशी सूचना देखील केली.

**डॉ. गुलाबराव राजे** यांनीदेखील इतिवृत्त संदर्भात आपले मत मांडताना नमूद केले की, अधिसभा सदस्य अधिसभेमध्ये आपली मते मांडत असतात; परंतु बऱ्याच वेळेला त्यातील अनेक गोष्टी इतिवृत्तात नमूद केल्या जात नाहीत आणि त्यामुळे पुन्हा-पुन्हा तेच प्रश्न पुढील सभांमध्ये चर्चेला येत असतात. उदा. त्यांनी उल्लेख केला की, आय.सी.एल. महाविद्यालयाचे श्री. अमर कडाळे, देवरुख महाविद्यालयाचे प्राध्यापक दहिबावकर, प्राध्यापक खरात अशा प्राध्यापकांचे प्रश्न तसेच हिंदुजा महाविद्यालय, पी. डी. कारखानीस महाविद्यालय, अभिनव विद्यालय येथील शिक्षकांचे प्रश्न हे सतत चर्चेला येत असतात; परंतु नावासह त्यांचा उल्लेख हा इतिवृत्तात नसतो.

**डॉ. संगिता पवार** यांनी इतिवृत्तामध्ये सर्व महत्वाच्या बाबींचा उल्लेख असावा, तसेच अधिसभा सदस्यांना विचारून मांडणी करावी, अशी सूचना केली. डॉ. सुप्रिया करंडे यांनी इतिवृत्त उशिरा मिळाले परंतु चांगले झाल्याबद्दल समितीचे व विद्यापीठ प्रशासनाचे अभिनंदन केले.

इतिवृत्तात दिलेल्या आश्वासनास अनुसरून व सर्व सदस्यांच्या मागणीनुसार सभागृहामध्ये येस बँक प्रकरणी गठीत केलेल्या समितीचा अहवाल ठेवण्यात आला.

यानंतर कुलगुरूंनी सत्यशोधन समितीच्या अहवालावर चर्चेस परवानगी दिली. प्र-कुलगुरुंनी श्री. संजय शेटे यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे सदस्य प्रा. डी. पी. मेहता, श्री. महादेव जगताप, श्री. सुधाकर तांबोळी आणि प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांचे आभार मानले. अतिशय कठीण परिस्थितीमध्ये खूप मेहनत घेऊन हा अहवाल तयार केल्याबद्दल धन्यवाद दिले. प्र-कुलगुरू यांनी अहवालामधील शेवटच्या शिफारशी वाचून दाखविल्या व संपूर्ण अहवाल अध्यक्ष आणि त्या समितीमधील सदस्य वाचून दाखवतील असे सांगितले. त्यावर श्री. धनेश सावंत यांनी मागणी केली की, ज्या अधिसभा सदस्यांनी समितीमध्ये भाग घेतला होता त्यांचे अनुभवही सभागृहात मांडण्यात यावेत. श्री. प्रदीप सावंत यांनी संपूर्ण अहवाल वाचून दाखवावा तसेच त्याची छायांकित प्रत मिळावी, अशी मागणी केली.

प्रा. डी.पी. मेहता यांनी संपूर्ण अहवाल व खालीलप्रमाणे अहवालातील शिफारशी सदनासमोर वाचून दाखविल्या:-

1. There is gross violation of ACCOUNTS CODE, referring to Section 1.72 even in absence of Investment committee, Finance and Accounts officer was duty bound to take pre sanction of

Vice – Chancellor. No such sanction was taken by Finance and Accounts Officer. This is clear dereliction of duty on the part of Finance and Accounts Officer.

2. Finance and Account Officer's signature is not appended in the banks after seven months of her joining. The facts on record reveals that willfully this situation was allowed by Finance and Accounts Officer. This caters to non performance of duty hence worthy of charge of persistent and willful negligence in performing Duty.

3. Deputy Registrar, Accounts has over performed his duty and willfully assumed exercised powers which were not delegated to the post he is holding. Not only he assumed powers of Finance and Accounts Officer but also acted as alternative to all competent authorities in making decisions about investments of University Funds. As a acting or proxy head of the accounts section in absence of willingness of Finance and Account Officer to act as a head of section on the matter of investments post facto He is worthy of charge of causing damage to the interest of University, Misappropriation of University finance, determined disobedience of account Code and willful negligence. Decided act of hiding the information from competent authorities in collusion with Finance and Accounts officer of the University.

4. Committee witnessed that there is no coordination of Finance and Accounts Sections with offices of competent authorities, many sanctions are taken post–facto where as regulatory provisions of Act, Code and statutes are demanding pre-sanctions by authorities as well as bodies like management council. This has been extended to the fact instead of judicious proposals to the various bodies Minutes of the meetings of internal committees are kept for approval.

5. Amending the Maharashtra Universities Account Code in the meeting of Management Council dated 21/8/2012, some powers were deliberated to officers of account section but no documents are supplied to the committee that such permission was obtained from Honorable Chancellors office for carrying out such amendment. In absence of such document, committee have its reservation of legal validity of these amendments put in practice.

6. The Member Secretary of Finance Committee of the University failed to perform her duties as per the Act and Account Code. Finance Committee should have exercised their power and jurisdiction, upon recommendations of the secretary who happens to be Finance and Accounts Officer which is missing in this matter. Absolute apathy shown by the Finance and Accounts Officer on very important function of monitoring and controlling Financial affaers and to take corrective measures to rectify any lapses by bringing it to the Financial Committee. It is utmost duty of Financial and Accounts Officer to monitor and control Finance as per guidance of Finance Committee and Management Council of the University. We observe a total failure on her part on this front, within the

section only all executions of investment have taken place and post facto approvals are taken by keeping all higher authority's in dark.

7. As a matter of statutory provisions Finance and Accounts Committee should appoint Investment Committee, this important task has not been done by the Committee, this is a sole responsibility of Member Secretary. Whereas Registrar of University who is also a member of the committee but it is observed that concern section has passed only selective information to the Registrar post-facto. Overindulgence of Deputy Registrar in finance matters of University and passive role of Finance and Account Officer in support of the same appears as sole cause of this crisis.

**Recommendations:**

1) Finance and Accounts officer should be given show cause notice on grounds of observation of the Committee. If she is on deputation from Maharashtra Government than she should be sent back to her original assignment.

   The person to be appointed as Finance and Account Officer should posses required qualification as stated in the Act.
2) Deputy Register of the section should be immediately isolated from the department and within the statutory framework for the purpose.
3) Investment Committee should be formed and made functional at the earliest.
4) For high Value, Transfers Two signatures out of three Namely Finance and Accounts Officer and amongst Registrar, Pro-Vice Chancellor, anyone should be assigned and for low value Finance & Accounts Officer and Deputy Registrar. This change needs to be carried out with immediate effect.
5) Henceforth all Fixed Deposits will be put only in Nationalized bank after inviting competitive quotations from banks
6) For inviting quotations for High Value deposits pre-sanctioned should be taken from Investment Committee and in absence of Investment Committee from Vice-Chancellor
7) All quotations for High Value deposits should be opened by a committee consists of Registrar, Finance and Account officer, Deputy Registrar of Accounts section, Any other person at higher level of Deputy Registrar from other sections assigned by Vice-Chancellor and in the presence of bidder bank representatives. Completion of process should be done in the same meeting.

यानंतर कुलगुरुंनी या अहवालानुसार विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीबद्दल सभागृहास माहीती देण्यासाठी प्र-कुलगुरुंना सूचना केली. :-

प्र-कुलगुरू यांनी सांगितले की, सर्वप्रथम गुंतवणूक समिती गठीत केली व त्याची वित्त व लेखा समितीमध्ये मान्यता घेतली. मुदत ठेवीमध्ये गुंतवणूक करण्याकरिता राष्ट्रीयकृत बँकांकडून दरपत्रक

(Quotation) मागविण्यात आले. एक लाख रकमेच्या वरील गुंतवणूकीकरिता वित्त व लेखा अधिकारी व कुलसचिव यांची एकत्रित सही असणे गरजेचे केले. एक लाख रक्कमेच्या खालील मान्यतेकरीता उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव, उपलेखापाल यांच्या अकाउंट कोडमधील रक्कमेनुसार संयुक्तीत सही असेल, अशा मार्गदर्शिका दिलेल्या आहेत. कोणत्याही कार्योत्तर मंजुरीने गुंतवणूक होणार नाही; कोणत्याही एका अधिकाऱ्याच्या सहीने गुंतवणूक होणार नाही, तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना ही सर्व माहीती असेल, कोणत्या महिन्यात कुठली मुदतठेवी गुंतवणुकीसाठी येतील; त्यादृष्टीने तयारी करायचे काम वित्त व लेखा विभागाला सांगितले गेले आणि त्याप्रमाणे त्यांचे कामही सुरू झाले आहे. त्यासाठी त्याची अगोदरच पूर्वकल्पना असल्यामुळे दरपत्रक मागवणे, उघडणे, गुंतवणूक समितीपुढे ठेवणे अश्या वित्त व लेखा विभागाला मार्गदर्शिका दिल्या आणि त्यासाठी सूचना केल्या आहेत." कॉर्पोरेट बँकिंगच्या संकल्पना वापरायला देखील सांगितले आहे; त्यामुळे आता विविध बँकांना संपर्क करणे शक्य होत आहे. बँकांचा सहभाग वाढत आहे; मागच्या वेळेस सात बँकांनी भाग घेतला होता, त्याप्रमाणे निविदा उघडताना कुलसचिव, वित्त व लेखा अधिकारी, उपकुलसचिव, कुलगुरूंचे नामनिर्देशित सदस्य यांची समिती असेल. त्यामुळे बारा वाजता ज्या दिवशी दरपत्रक उघडले जातील; तेथे ते समिती व बँकेतील प्रतिनिधींच्या उपस्थितीत उघडतील आणि नंतर गुंतवणूक समितीपुढे ठेवल्या जातील; त्याबरोबर कोणत्याही बँकेत १०० कोटींच्या वर ठेविंची गुंतवणूक करण्यात येऊ नये, असा निर्णय घेण्यात आला आहे; या सगळ्या मार्गदर्शिका देण्याकरिता समितीचे आभार मानले १७ ऑगस्टला अहवाल मिळाल्यानंतर काही दिवसातच कारवाई केली गेली आहे, अशाप्रकारे प्र-कुलगुरू यांनी अधिसभेसमोर शिफारशी सादर केल्या.

**श्री. डी.पी. मेहता** यांनी त्याचवेळी सभागृहस माहिती दिली की, बँकेच्या मॅनेजर बरोबर बैठक घेतली गेली आणि पाच दिवसात ७६ कोटी वसूल केले गेले. त्यावर श्री. प्रदीप सावंत, सौ. शितल शेठ-देवरुखकर यांनी प्रा. डी.पी. मेहता यांचे अभिनंदन केले.

**श्री. प्रदीप सावंत** यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना प्र-कुलगुरू म्हणाले की, गुंतवणूक समिती जी गुंतवणूक ठरवेल त्याला वित्त व लेखा समितीने दिलेल्या मार्गदर्शिकेप्रमाणेच काम करावे लागेल आणि त्यानंतर वित्त व लेखा समितीच्या बैठकीतून ते इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेमध्ये येईल.

सत्यशोधन समितीच्या अहवालाप्रमाणे दोघांवर कारवाई झालेली आहे. कुलगुरू यांनी सांगितले की, वित्त व लेखा अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून उपकुलसचिव, वित्त व लेखा विभाग यांना त्वरित रजेवर पाठविण्यात आले आहे. त्यांनादेखील कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे त्याचबरोबर उपकुलसचिव यांना दिलेला गुणवंत कर्मचारी पुरस्कारही स्थगित केला आहे.

यानंतर कुलगुरूंनी सर्व सदस्यांना सूचना केली की, सर्व घटना आपल्या समोर आहेत अधिका-अधिक पारदर्शकता आणण्यासाठी तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही. त्यादृष्टीने उपकुलसचिव, वित्त व लेखा विभागात त्वरित तंत्रज्ञान आणण्याची गरज आहे; सर्वांनी याबाबत सूचना कराव्यात, असे आवाहन कुलगुरुंनी सदस्यांना केले.

**श्री. संजय शेटे** यांनी कुलगुरूंच्या लक्षात आणून दिले की, विद्यापीठाने किती मुदतठेवीमध्ये गुंतवणूक ह्या छोट्या कालावधीसाठी कराव्यात आणि कोणत्या मुदतठेवीमधील गुंतवणुकी मोठ्या कालावधीकरिता करावी जेणेकरून व्याजदर जास्त मिळेल हे ठरवणे आवश्यक आहे.

**डॉ. सुप्रिया करंडे** यांनी सभागृहासमोर प्रश्न उपस्थित केला की, मार्गदर्शिका आणि अकाउंट कोड हे पूर्वीपासूनच आहेत म्हणजे एवढी वर्ष गुंतवणुक या अकाउंटिंग कोडप्रमाणे होत नव्हत्या का? आणि तसे असेल तर आपल्याला पूर्वीच्या गुंतवणुकी देखील तपासाव्या लागतील त्याचबरोबर त्यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिले की, एक तज्ज्ञसमिती ज्यामध्ये सनदी लेखापाल हे सल्लागार असतील अशी समिती नेमावी जिचे मुख्य काम आपल्या गुंतवणुकीवर लक्ष ठेवणे असेल, विद्यापीठाची गुंतवणुक ही फार महत्त्वाची असून त्यातून मिळणाऱ्या व्याजावर विद्यापीठाचा कारभार अवलंबून आहे. त्यामुळे त्या गुंतवणुकी योग्य ठिकाणी होत आहेत का? आणि त्या योग्य ठिकाणी व्हाव्यात याकरिता सहाय्यक कुलसचिव, उपकुलसचिव तसेच कुलसचिव ही काही तज्ज्ञ मंडळी नसल्याने त्या क्षेत्रातल्या तज्ज्ञ मंडळींना घेऊन एक समिती गठित करण्यात यावी, जी आपल्याला गुंतवणुकी करिता योग्य मार्गदर्शन करेल.

**श्री. प्रवीण पाटकर** यांनी चर्चेत सहभाग घेत सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, १४० कोटींचा अहवाल आपल्याकडे आला आहे; जवळपास आपल्याकडे ७०० कोटींची ठेवी आहेत त्यावर ७ ते ८ टक्के व्याज हे काही फार मोठे नाही; बाकी अभिमत विद्यापीठे तसेच खाजगी विद्यापीठे ह्या योग्य पद्धतीने गुंतवणुक करून त्यातून जास्तीत-जास्त व्याज कसे मिळेल, याकडे लक्ष देतात. एक लाख रुपये गुंतवणूक करण्यासाठी आपणाला दोघांची सही घ्यावी लागते; विद्यापीठाच्या बिल्डिंग, टेक्नॉलॉजी सिस्टीम, कँटीन, चांगल्या कामांची प्रसिद्धी आणि विद्यापीठ परिसर याची दुरावस्था आहे. त्याचबरोबर आता कोरोना काळामुळे मोठमोठ्या महाविद्यालयांचे आकर्षण मुलांमध्ये कमी झाले आहे. तसेच तंत्रज्ञानामुळे आपण पारदर्शकता आणू शकतो; किती रक्कम जमा होत आहे? किती खर्च होत आहे? किती शिल्लक आहे? हे आपणास तंत्रज्ञानामुळे कळेल.

**श्री. संजय शेटे** यांनी देखील ७०० कोटी वर प्रकाश टाकत माहिती दिली की, ७०० कोटी ही फार मोठी रक्कम नाही. तसेच सातशे कोटी पैकी साडेतीनशे कोटी हे कर्मचाऱ्यांचे पेन्शन फंडस् आहेत आणि

बरीचशी रक्कम ही आपण काही विशिष्ठ कारणासाठी ठेवलेली आहे त्यामुळे त्याला हात लावता येणार नाही, म्हणजेच गेल्या १६३ वर्षांमध्ये वापरण्याजोगे असे शंभर ते दीडशे कोटी विद्यापीठाकडे जमा आहेत, ही काही चांगली स्थिती नाही.

**श्री. प्रवीण पाटकर** यांनी सांगितले की, या मध्ये बदल करावे लागले तर तेही चालतील; परंतु विद्यापीठाचा निधी योग्य ठिकाणी गुंतवावा; ७ ते ८ टक्के व्याजदर यांनी काहीच नाही होणार. त्यावर श्री. संजय शेटे म्हणाले की, आता व्याजदर ४ ते ५ टक्क्यांवर आला आहे. श्री. प्रवीण पाटकर यांनी नमूद केले की, विद्यार्थ्यांचा पैसा आज विद्यार्थ्यांसाठी वापरता आला नाही तर त्याचा काहीच उपयोग होणार नाही; परंतु विद्यार्थ्यांसाठी, असा वेगळा पैसा शिल्लक नाही, असे ते म्हणाले.

**डॉ. संगीता पवार** यांनी नमूद केले की, पुढच्या सहा महिन्यांमध्ये कोरोनोच्या परिस्थितीमुळे बरीच नवीन आव्हाने येणार आहेत त्यामुळे नोव्हेंबर मध्ये अधिकृत अधिसभा घेणे रास्त आहे त्याच बरोबर सत्यशोधन समितीने केलेल्या प्रयत्नांबद्दल डॉ. संगीता पवार यांनी आभार व्यक्त केले. ७६ कोटी प्राप्त झाले; परंतु उर्वरित रक्कम परत कशी मिळणार? असा प्रश्नही सभेपुढे उपस्थित केला.

**श्री. सुधाकर तांबोळी** यांनी ऑनलाइन झूम मीटिंग व्हिडिओ रेकॉर्डिंग मिळणार आहे का? असा मुद्दा उपस्थित केला त्यावर प्र-कुलगुरू यांनी होकारार्थी उत्तर दिले.

**श्री सुधाकर तांबोळी** यांनी आणखीन एक गोष्ट सभागृहासमोर मांडली की, विद्यापीठाच्या अखत्यारित येणाऱ्या काही जिल्ह्यांमध्ये नैसर्गिक आपत्ती आल्या त्यावेळी मंत्रीमहोदयांसोबत दौऱ्यावर घेऊन जाताना फक्त पदवीधर मतदारसंघातील काही सदस्य होते; विद्यापीठ प्रशासन असा दुजाभाव का करीत आहे? इतर अधिसभा सदस्यांना देखील दौऱ्याबाबत कळवणे गरजेचे होते; परंतु असे झाले नाही. ॲड. वैभव थोरात यांनी नोव्हेंबर मध्ये पुन्हा एकदा अधिसभा घ्यावी, या मुद्द्याला पाठिंबा देत कुलगुरूंना विचारले की, प्रत्येक अधिसभेमध्ये अधिकारी आणि पत्रकारांना उपस्थित राहण्याची परवानगी असते पण या सिनेटमध्ये अधिकारी आणि पत्रकार हे घटक उपस्थित नाहीत; त्यावर कुलगुरू म्हणाले की, नवीन परीनियमात प्रसारमाध्यमे किंवा अधिकारी यांचा कुठेही संदर्भ नाही तरीदेखील परंपरेप्रमाणे आपण त्यांना सभेला उपस्थित राहण्याकरिता आमंत्रण देतो, त्यामुळे पुन्हा सुरळीत प्रमाणे सर्व सुरु झाल्यानंतर त्यांचीही उपस्थिती असेल.

**प्रा. अनंत लोखंडे** यांनीदेखील श्री. सुधाकर तांबोळी यांना समर्थन देत सांगितले की, कोकणामध्ये बैठक झाली, त्यावेळी त्या जिल्ह्यातील अधिसभा सदस्यांना तरी कळवायला पाहिजे होते. याबाबत कुलगुरू यांनी सांगितले की, या बैठकांचे आयोजन शासन कार्यालयामधून करण्यात आले होते व त्या दौऱ्याला कुलगुरू, प्र-कुलगुरू हे आमंत्रित होते. कुलगुरुंनी असे ही स्पष्ट केले की, यापुढे विद्यापीठाकडून जेव्हा कधी

असे दौरे किंवा बैठकीस पाचारण करण्यात येईल, त्यावेळी सर्व अधिसभा सदस्यांना त्याची माहिती देण्यात येईल.

समितीने अहवालाचे जे सादरीकरण केले त्याबद्दल डॉ. सुप्रिया करंडे यांनी आपल्या विद्यापीठात कर्मचाऱ्यांसाठी काही कोड ऑफ कण्डक्ट नसल्याची खंत व्यक्त केली; त्यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिले की, जो अधिकारी दोषी होता त्याला निलंबित केले असते तर पुढे बरेचसे प्रश्न टाळता आले असते, जसे की 'गुणवंत कर्मचारी पुरस्कार'.

**प्रा. महादप्पा गोंडा** म्हणाले की, स्टाफ वर दोन प्रकारचे गुन्हे असू शकतात, दखलपात्र आणि अदखलपात्र अशा प्रकरणी कारणे दाखवा नोटीस ही द्यावीच लागते. त्यावर कुलगुरू म्हणाले की, सर्वप्रथम जे वैधनिक आहे ते तर पाळावे लागतातच; परंतु त्या व्यतिरिक्त नैसर्गिक न्यायाचे तत्व हा प्रकार ही असतो; त्यामुळे प्रत्येकाला संधी द्यावी लागते.

त्यावर **डॉ. सुप्रिया करंडे** म्हणाल्या की, हे तर आहेच; परंतु आपल्याला विद्यापीठाचा कोड ऑफ कण्डक्ट देखील पाळावा लागतो. जर सक्तीच्या रजेवर पाठवून वेतन थांबणार नसेल किंवा ती अर्धी होणार नसेल तर त्या गोष्टीचा काहीही फरक हा कर्मचाऱ्यावर पडणार नाही; नैसर्गिक न्यायाव्यतिरिक्त आपण आपल्या विधी कक्षाला विचारून या बाबतीतील कायदेशीर पद्धतीचे पालन करणे गरजेचे आहे; निलंबनाची वेळ ही कुठल्याही व्यक्तीवर येऊ नये; परंतु निलंबन झाल्यावर जर त्याला पूर्ण पगार मिळत असेल, तर त्या निलंबनाला काहीच अर्थ उरत नाही.

**श्री. प्रदीप सावंत** यांनी सुप्रिया करंडे यांच्या मताशी सहमती दर्शवित, असे सांगत कुलगुरूंना प्रश्न केला की, हा अहवाल जेव्हा त्यांच्याकडे आला त्यावेळी उपकुलसचिव त्याच विभागात कार्यरत होते; त्यावेळी जे काही पुरावे असतील ते पुरावे देखील त्याने नष्ट केल्याची शक्यता नाकारता येत नाही; त्या कर्मचाऱ्याला तिथून हलवणे गरजेचे होते.

**डॉ. सुप्रिया करंडे** म्हणाल्या की, त्वरित त्या कर्मचाऱ्याला तिथून हलवून दुसऱ्या विभागात किंवा सक्तीच्या रजेवर पाठवायला हवे होते कारण तो पुरावे नष्ट करू शकतो. दुसरे म्हणजे ताबडतोब तीन दिवसाची कारणे दाखवा नोटीस काढून जर उत्तर समाधानकारक नसेल तर निलंबनाचे आदेश देणे गरजेचे होते आणि त्या काळात पगारामध्ये कपात करणेही गरजेचे होते.

**श्री. प्रदीप सावंत** यांनी आणखी एक गोष्ट निदर्शनास आणून दिली की, गुणवंत कर्मचारी पुरस्कार स्थगित केला; परंतु ज्यावेळी हा अहवाल कुलगुरुंपर्यंत पोहोचला व त्यांना या अहवालाची कल्पना होती, त्यावेळी कुलगुरुंनी ते करणे गरजेचे होते. डॉ. सुप्रिया करंडे यांनीदेखील श्री. प्रदीप सावंत यांच्या मताशी

आपण सहमत असल्याचे दर्शवत नमूद केले की, सदर कर्मचाऱ्याचे नाव पुरस्काराच्या यादीमधून वगळणे क्रमप्राप्त होते.

**श्री. संजय शेटे** यांनीदेखील डॉ. सुप्रिया करंडे यांच्या मताला समर्थन दिले. श्री. संजय शेटे म्हणाले की, अहवाल येण्यासाठी एप्रिल महिना लागला; अकाउंटिंग कोड आणि विभागाची इतरही कामे होती की यामध्ये ह्या गोष्टी करणे शक्य नव्हते; परंतु १४० कोटींच्या मुद्द्यावर प्रथम लक्ष दिले; बँकेच्या अधिकाऱ्यांना भेटून ७६ कोटी परत मिळवून घेण्यासाठी प्रयत्न करावे लागले; परंतु सदर कर्मचारी त्याच विभागात कार्यरत असल्याने त्याला त्वरित हलवून कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे निलंबन करायला पाहिजे होते.

श्री. सुधाकर तांबोळी यांनी सांगितले की, अंतरिम अहवाल आणि अंतिम अहवाल यासंदर्भामध्ये समितीने परिश्रम करून अहवाल सादर केला; परंतु ज्यांचे निलंबन व्हायला पाहिजे होते त्यांना आपण गुणवंत कर्मचारी म्हणून गौरव करता, हे कुठेतरी चुका करणाऱ्याला प्रोत्साहन देण्यासारखे आहे.

त्यावर प्रा. डी.पी. मेहता म्हणाले की, श्री. तांबोळी हे योग्यच बोलत आहेत त्यांनी सभागृहाला माहिती दिली की, स्टॉक एक्सचेंज, रिझर्व बँक व सेबी यांच्याशी संवाद साधल्यानंतर अशी माहिती आहे की, येस बँक आता चांगल्या स्थितीत आहे आणि आपले पैसे देखील परत मिळतील; परंतु एखाद्या व्यक्ती बद्दल अहवाल सादर केल्यानंतर त्याला गुणवंत कर्मचारी पुरस्कार देणे म्हणजेच त्याच्याविरुद्धची कारवाई कमकुवत करून टाकण्यासारखे आहे. त्यांनी आक्षेप नोंदवला की, एकच अधिकारी १४० करोडच्या गुंतवणुकीच्या निर्णयाच्या सर्व प्रक्रिया पूर्ण करतो हे कसे? त्यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिले की, सत्यशोधन समितीच्या सदस्यांनी भरपूर मेहनत करून कुठलाही पूर्वग्रह न बाळगता माहितीच्या आणि कागदपत्रांच्या आधारावर अहवाल तयार केला आहे आणि जर अशा व्यक्तीला गुणवंत कर्मचारी पुरस्कार मिळाला तर अहवाल चुकीचा ठरतो, तसेच लॉकडाऊनच्या काळात आणखीन काही गुंतवणुकी संदर्भातले व्यवहार झाले आहेत त्याचीदेखील चौकशी आम्ही करू, अशी माहिती त्यांनी सभागृहाला दिली.

**श्री. संजय शेटे** यांनी कुलगुरू महोदयांना विनंती केली की, गुणवंत कर्मचारी पुरस्कार स्थगित न करता तो काढून घेतला गेला पाहिजे.

**श्री. प्रदीप सावंत** व **श्री. सुधाकर तांबोळी** यांनी याबाबतीत श्री. संजय शेटे यांना समर्थन दर्शवले.

**श्री. सुधाकर तांबोळी** यांनी सभागृहाला माहिती दिली की, श्री. जयतापकर ह्या कर्मचाऱ्याचेही निलंबन झाले होते त्यांना देखील यावर्षी गुणवंत कर्मचारी म्हणून जाहीर केले. श्री. अंबावडे, उपकुलसचिव यांच्याबाबतीत दिलेला अहवाल तसेच श्री. जयतापकर यांच्या निलंबनाबाबत दुर्लक्ष करत आपण त्यांना

गुणवंत कर्मचाऱ्यांचा पुरस्कार दिला, ही प्रशासनाकडून झालेली फार मोठी चूक आहे; याचे स्पष्टीकरण त्यांनी प्रशासनाकडून मागितले; तसेच जे कर्मचारी ३० ते ३५ वर्ष प्रामाणिकपणे काम करत आहे त्यांना गुणवंत कर्मचारी पुरस्कार दिले गेले पाहिजे.

**प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी** यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिले की, या अहवालाप्रमाणे सर्वप्रथम एक गोष्ट लक्षात येते की, वित्त व लेखा विभागामध्ये वर्षानुवर्ष कर्मचारी एकाच विभागात काम करत आहेत, त्यांच्या बदल्या होत नाहीत; दुसरा मुद्दा असा की, ज्या फंडात गुंतवणूक होते तो लायबिलिटी फंड आहे; कुठल्या ना कुठल्या कामासाठी विद्यापीठाला तो खर्च करायचा आहे; परंतु त्याबद्दलचा कुठलीही योजना विद्यापीठाकडे नाही आणि तिसरी गोष्ट अशी की, विद्यापीठ कर्मचाऱ्यांसाठी सेवाशर्ती प्रमाणसंहिता अस्तित्वात आहेत आणि त्याच्या अधीन राहूनच कारवाई झाली पाहिजे; त्यामुळे प्रशासनाने त्या गोष्टीमध्ये विशेष लक्ष देऊन गुणवंत पुरस्कार दिला गेला आहे तो त्वरित काढून घ्यावा जेणेकरून विभागीय चौकशीमध्ये योग्य निर्णय घेता येईल.

**डॉ. सुरेश मैंद** यांनी सत्यशोधन समितीचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या कामांची प्रशंसा केली. तसेच त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, मागील इतिवृत्तामध्ये दोन मुद्दे मांडले गेले होते; एक शिक्षक भरती संदर्भात प्रशासनाकडून आश्वासन देण्यात आले होते; परंतु आजही ते पूर्ण झालेले नाही. त्याचबरोबर सेवार्थ प्रणालीच्या संदर्भात मुद्दा मांडला होता की, बरेचसे प्रश्न शासनाकडे तसेच आहेत त्यातल्या काही त्रुटी आणि छोटे-मोठे प्रश्न आहेत त्याबाबतही आश्वस्त केले गेले होते की, सह-संचालकांच्या मदतीने मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा करू; परंतु परिस्थिती आजही जैसे थे. तसेच शिक्षकांचे अजूनही डीसीपीएस अकाउंट असे काही प्रश्न अपूर्ण आहेत; त्यांना ताणतणावामध्ये राहावे लागते; ३३ वर्ष सेवा केल्यावर सेवानिवृत्त झाल्यानंतर देखील शिक्षकांना त्यांची पेन्शन मिळू शकत नाही; नेमणुक झाल्यानंतर संचालक किंवा सह-संचालक कार्यालयामधून त्याची प्रक्रिया सुरळीतपणे करून घेणे गरजेचे आहे; त्या वेळोवेळी न केल्यामुळे PF संदर्भातले प्रश्न मार्गी न लावल्यामुळे अशा प्रकारचे त्रास शिक्षकांना सहन करावे लागत आहेत; या बाबतीत पुन्हा एकदा लक्ष देण्यात यावे, अशी विनंती त्यांनी केली.

**श्री. सुधाकर तांबोळी** यांनी इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि प्रिंट मीडिया यांना समाविष्ट केले नाही; त्यांना लिंक दिली नाही, त्याबद्दल विचारणा केली असता प्र-कुलगुरु म्हणाले की, आभासी सभा असल्यामुळे तसेच परीनियमांमध्ये अशी कुठलीही तरतूद नसल्यामुळे पत्रकारांना पाचारण करता आले नाही; परंतु सर्व सुरळीत झाल्यानंतर पूर्वीच्या परंपरेप्रमाणे त्यांना बोलविण्यात येईल.

**डॉ. रवींद्रनाथ रसाळ** यांनी सत्यशोधन समितीने केलेल्या कामाबद्दल त्यांचे अभिनंदन केले तसेच त्यांना धन्यवाद दिले. डॉ. रसाळ यांनी प्रस्ताव मांडला की, अशा प्रकारचे गैरव्यवहार होत असतात त्यावर नियंत्रण आणण्यासाठी व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद तसेच अधिसभेमधून एक समिती तयार करावी; शिक्षकीय पदे, शिक्षकेतर पदे भरली जात नाहीत; महाविद्यालयामध्ये प्राचार्य, व्यवस्थापन व शिक्षकेतर कर्मचारी यांबद्दल बऱ्याचशा तक्रारी असतात त्याकरिता युनियनच्या वतीने या तक्रारींची माहिती विद्यापीठ स्तरावर दिली जाते; त्यावर समिती गठीत केली जाते; महाविद्यालयाची तपासणी होते; अधिसभेमध्ये चर्चा होते; पण त्यातून ठोस असे काहीच घडत नाही. नवीन भरती करिता पेन्शन स्कीम वेगळी आहे त्यामुळे मध्यंतरी तो मुद्दाही उपस्थित झाला होता. या सर्व गोष्टींकरिता अधिसभेमधून एखादी समिती गठीत करावी, अशी विनंती त्यांनी केली. कुलगुरूंची कॉमनवेल्थ समितीवर नेमणूक झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या आणि राजाबाई टॉवरची शान आणखीन वाढली, असे नमूद केले. त्याच बरोबर प्रशासनाने कुठल्याही प्रकारचा गलथानपणा सहन न करता शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य तसेच विद्यार्थी यांच्या समस्यांचे निराकारण करणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले.

**डॉ. गुलाबराव राजे** यांनी प्रशासनाला सुचित केले की, प्रेस आणि मीडिया यांना सिनेटमध्ये बसण्याची आपली प्रथा होती; परंतु या अधिसभेमध्ये आपण त्यांना पाचारण केले नाही; त्याबद्दल अधिकृत मागणी केली की, अधिसभा ऑनलाईन किंवा ऑफलाईन कोणत्याही पद्धतीची असो प्रेसला बोलावून घ्यावे.

**डॉ. अनंत लोखंडे** यांनी सत्यशोधन समितीने खूप चांगला अभ्यास करून ज्या शिफारशी केल्या आणि अहवाल सादर केला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. तसेच कुलगुरू यांचेदेखील अभिनंदन केले. अधिसभा बैठकीचे सूचना पत्रक वेळेवर प्राप्त होत नसल्याने प्रश्न पाठविण्यास अडचणी निर्माण होत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. यापूर्वी देखील असाच अनुभव आल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. अधिसभेचे इतिवृत्त वेळेवर मिळावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली व कार्यवाही अहवाल न मिळाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

रत्नागिरी उपपरिसराबद्दल ते म्हणाले की, बराच पाठपुरावा केल्यानंतर एमकेसीएलचे काउंटर रत्नागिरी उपपरिसरामध्ये सुरु झाले; पात्रता प्रमाणपत्रे ऑनलाइन सुरु झाली; परीक्षा फॉर्म आजूबाजूच्या जिल्ह्यातले ऑनलाईन घेतले जातात, त्याबद्दल विद्यापीठाचे आभार मानले परंतु स्थलांतर प्रमाणपत्र हे विद्यार्थ्यांना ऑनलाइन मिळावे यासाठी आपण स्वतः त्याचा पाठपुरावा केला; मागच्या बैठकीमध्ये कुलगुरुंनी आश्वासन दिले होते की, स्थलांतर प्रमाणपत्र ऑनलाइन देण्यात येईल; परंतु आज पर्यंत एकाही विद्यार्थ्याला ऑनलाइन स्थलांतर प्रमाणपत्र मिळालेले नाही. कोविडच्या काळात पाचशे-सहाशे किलोमीटर

प्रवास करून सिंधुदुर्ग व रत्नागिरी येथील विद्यार्थांनी मुंबई गाठायची; त्यासाठी हजार-हजार रुपये खर्च करायचा आणि त्रास सहन करायचा हे आता बंद होणे गरजेचे आहे आणि म्हणून स्थलांतर प्रमाणपत्र ऑनलाइन देण्यात यावे. त्याचबरोबर मागील बैठकीमध्ये कुलगुरूंकडून आश्वासन देण्यात आले की, गुणपत्रिका मुद्रणालय (मार्कशीट प्रिंटिंग) चे एक युनिट रत्नागिरी उपपरिसराला बनविले जाईल जेणेकरून विद्यार्थांना गुणपत्रिका वेळेवर मिळतील; परंतु आतापर्यंत गुणपत्रिका छपाईचे काम रत्नागिरी उपपरिसरामध्ये सुरू झालेले नाही. तसेच मागील बैठकीमध्ये पाच वर्षाच्या बृहत आराखड्याबद्दल चर्चा झाली; तो आराखडा आपण तयार केला; परंतु दुसऱ्या बाजूने मंत्रालयीन कार्यालयातून बृहत आराखडा वेगळाच आला; यासंदर्भात ठोस भूमिका घेणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. एस. पी. अभियांत्रिकी महाविद्यलयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पदवीदान समारंभात पदवी प्रमाणपत्र दिली नव्हती त्याकरिता त्या महाविद्यालयावर योग्य ती कारवाई करू, असे सांगण्यात आले होते. एक समितीदेखील गठीत करण्यात आली होती. त्या महाविद्यालयावर कोणती कारवाई करण्यात आली? बराचश्या महाविद्यालयांमधून मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून पूर्ण फी घेतली जाते आणि मग प्रवेश देण्यात येतो हा त्या विद्यार्थांवर अन्याय आहे. त्याबाबतीत ठोस निर्णय घेण्याची गरज आहे.

**डॉ. गुलाबराव राजे** म्हणाले की, घरांमध्ये चाळीस ते पन्नास हजाराची मुदतठेव ठेवायची असेल तरी आपण कुटुंबीयांचा सल्ला घेतो आणि जर ₹ १४० कोटींच्या ठेवीचा प्रश्न येतो तर फक्त एका अधिकाऱ्याकडून ही ठेव ठेवली गेली; कुणी एक अधिकारी १४० कोटींची ठेव ठेवू शकत नाही, यामध्ये अनेक व्यक्ती संशयाच्या भोवऱ्यात मध्ये असू शकतात आणि त्याचा तपास अद्याप झालेला नाही; पहिल्या टप्प्यामध्ये सत्यशोधन समितीने जे शोधून काढले ते अपूर्ण आहे; दुसरा टप्पा का महत्त्वाचा आहे यामागे खरे सूत्रधार कोण आहेत ते शोधणे गरजेचे आहे; एक उपकुलसचिव ज्याला कोणत्याही समितीमध्ये स्थान नाही असा अधिकारी हे सगळे निर्णय कसे घेऊ शकतो? आणि त्यानंतर विद्यापीठाकडून त्याला गुणवंत पुरस्कारही मिळतो या सगळ्या प्रकरणाची पाळेमुळे खोलवर गेलेली आहेत हे शोधणे फार गरजेचे आहे, जोपर्यंत हे शोधले जात नाही तोपर्यंत खरे सूत्रधार समोर येणे कठीण आहे. अनेक सदस्यांनी आपले मत मांडताना शंका उपस्थित केली की, यापूर्वी देखील अशा पद्धतीचे व्यवहार घडले असण्याची शक्यता आहे, म्हणजेच कुरतडण्याची ही प्रक्रिया केव्हापासून चालत आली आहे आणि कोण-कोण कुरतडणारे अधिकारी आहेत हे आपल्याला शोधून काढणे गरजेचे आहे, म्हणूनच सत्यशोधन समितीच्या पहिल्या टप्प्यानंतर दुसरा टप्पा सुरुवात होणे फार गरजेचे आहे. पहिल्या टप्प्यात समितीने नेमके काय घडले हे समोर आणल आहे; परंतु जास्त खोलात जाण्यासाठी एफ.आय.आर. दाखल करणे देखील गरजेचे आहे; विद्यापीठातील गुंतवणूक

करण्याच्या प्रक्रियेशी संबंधित असलेल्या समितीतील सर्व व्यक्तींची चौकशी होणे गरजेचे आहे; बऱ्याच वेळा कुलगुरुंशी बोलताना माहिती मिळते की, विद्यापीठाची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट आहे; त्यामागे बरीच कारणे असतील, या प्रकरणाचा शोध घेताना ती कारणदेखील आपल्याला कळू शकतात; डॉ. गुलाबराव राजे यांनी सभागृहाला विनंती केली की, या प्रकरणाच्या खोलापर्यंत जाऊन खरा सूत्रधार कोण यांचा शोध घ्यावा तसेच याबाबतची मार्गदर्शक तत्वे नेमकी काय आहेत, ती सभागृहाला समजावीत.

त्यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिले की, कलम ९४, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमानुसार वित्त व लेखा समितीमध्ये कोण-कोण असावेत याबद्दल तरतूद आहे. कुलगुरू हे अध्यक्ष असून प्र-कुलगुरू, लेखा व कोषागरे संचालक किंवा त्यांचा नामनिर्देशित सदस्य, व्यवस्थापन परिषदेमधुन कुलपतींनी नामनिर्देशित केलेला सदस्य, कुलगुरुंनी विद्यापरिषदेवरील नामनिर्देशित केलेली व्यक्ती, व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले दोन तज्ज्ञ १. लेखांकन व लेखा परीक्षा क्षेत्रातील २. वित्त क्षेत्रातील तज्ज्ञ, कुलसचिव आणि वित्त व लेख अधिकारी हे सर्व अधिकारी पाच वर्षांसाठी त्या समितीवर नामनिर्देशित केलेली असतात आणि या समितीचे काम वित्त आणि प्रशासन याबद्दल योग्य सल्ला देणे; परंतु एवढ्या सगळ्या अधिकाऱ्यांकडून योग्य सल्ला न मिळाल्यामुळे अशा गोष्टी घडल्या, तसेच बऱ्याच उणिवा, चुका आढळल्या.

**श्री. प्रकाश दातार** यांनी मार्चमध्ये झालेल्या अधिसभेमध्ये त्यांनी २००६ नंतर एमफील धारकांना CAS चे लाभ त्यांना प्राप्त झाले आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर प्रशासनाकडून अपुरी माहिती मिळाली तसेच मागील सभेत आश्वासन दिले होते, माहिती भरपूर असल्यामुळे ऑफलाइन पद्धतीने पुरवली जाईल; परंतु त्यानंतर आतापर्यंत कुठलीही माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही याकडे सभेचे लक्ष वेधले, तसेच दुसरा मुद्दा उपस्थित करताना त्यांनी सीडीसीचे गठन न केलेल्या महाविद्यालयांवर आपण कारवाई का करत नाही? असा प्रश्न उपस्थित केला. भाऊसाहेब नेने महाविद्यालय प्रशासनाकडून प्राचार्यांना पाठीशी घालण्यात येत आहे, असा आरोपही त्यांनी केला. १४० कोटींच्या येस बँकेच्या ठेवीबाबत डॉ. राजे यांनी जे मुद्दे मांडले त्याला समर्थन दिले. आज लॉकडाऊन काळात २०% विद्यार्थीदेखील ऑनलाइन शिक्षण घेऊ शकत नाहीत कारण त्यांच्याकडे स्मार्टफोन नाहीत; इंटरनेट नाहीत; विशेषतः रायगड मधील डोंगराळ भागांमध्ये विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणापासून वंचित आहेत आणि अशावेळी जर विद्यार्थ्यांचा पैसा हा अशा मार्गाने जाणार असेल तर त्याचा काय उपयोग? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. सत्यशोधन समितीच्या प्रयत्नाने ७६ कोटी परत मिळवता आले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना उर्वरित ६८ कोटी देखील लवकरात लवकर कसे मिळवता येतील या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे असे नमूद केले व अध्यक्ष महोदयांना

विनंती केली की, या प्रकरणाची पाळेमुळे खणून यामागे नक्की कोणत्या व्यक्तीचा हात आहे याची सखोल चौकशी व्हावी आणि त्यासाठी निवृत्त न्यायाधीश नियुक्त करावा, अशी मागणी केली.

**श्री. महादेव जगताप** म्हणाले की, वित्त व लेखा अधिकारी यांना प्रशासनाकडून नोटीस दिलेली आहे तर वित्त व लेखा अधिकाऱ्यांना नोटीस देण्याचा अधिकार विद्यापीठ प्रशासनाला आहे का? ते तुमचे कर्मचारी आहेत का? उपकुलसचिव यांना पण नोटीस दिलेली असेल तर विद्यापीठांमध्ये एम.सी.एस.आर. नियम लागू होतो की विद्यापीठाचे स्वतःचे नियम आहेत या दोन गोष्टीचा खुलासा करावा.

कॉमनवेल्थ सारख्या जागतिक पातळीवरच्या संस्थेचे सभासदत्व कुलगुरुंना मिळाल्याबद्दल सौ. शीतल शेठ-देवरुखकर यांनी कुलगुरूंचे अभिनंदन केले. पत्रकारांना ह्या ऑनलाईन अधिसभेसाठी निमंत्रण देणे आवश्यक होते जेणेकरून येस बँकेच्या मुदत ठेवींच्या बाबतीत विद्यापीठाने केलेल्या कार्यवाही संदर्भातली माहितीही लोकांपर्यंत जाणे आवश्यक होती, असे त्यांनी सांगितले. त्याच बरोबर बँकेच्या संदर्भातला अहवाल सर्व अधिसभा सदस्यांना उपलब्ध करावा, अशीही मागणी केली. बँकेच्या ठेवीच्या संदर्भातील घोटाळ्यात सहभागी कर्मचाऱ्याला गुणवंत पुरस्कारासाठी निवडणे कसे चुकीच आहे हे सांगताना विद्यापीठाअंतर्गत नियंत्रण प्रणाली असावी याचा आग्रह धरला. विद्यापीठातील वित्त विभागातील कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षे बदल्या झालेल्या नाहीत त्यासाठी बदली कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली पाहिजे. खूप मोठी ऐतिहासिक परंपरा असलेल्या विद्यापीठामध्ये खूप मोठा आर्थिक गैरव्यवहार होऊन नुकसान होणार असेल तर अशा व्यक्तींवर आर्थिक गुन्हेशाखेमार्फत गुन्हा नोंदविला पाहिजे त्याचबरोबर १४० कोटींपैकी केवळ ७६ कोटींच परत मिळालेले आहेत बाकीच्या मुदत ठेवी सुरक्षित आहेत का? याचा खुलासा करावा अशी मागणी त्यांनी केली.

**श्री. मिलिंद साटम** यांनी गुणवंत कर्मचारी निवड समितीच्या संदर्भात थोडक्यात भाष्य केले. समितीचा एक सदस्य या नात्याने त्यांना आलेले अनुभव सभेपुढे मांडताना गुणवंत कर्मचारी पुरस्कार हे घाई-घाईत जाहीर होतात त्याबद्दल नाराजी व्यक्त केली. सदस्यांना संबंधित कर्मचाऱ्यांची तपशीलवार माहिती सभेच्या दिवशी न देता किमान एक महिना अगोदर दिली पाहिजे; एका निश्चित आदर्श प्रक्रियेचे पालन झालेले नाही अशी खंत व्यक्त करून यापुढे विद्यापीठाने दक्षता घ्यावी, असे सुचविले.

सदर गुणवंत कर्मचारी पुरस्कार निवडीच्या चर्चेमध्ये श्री. प्रदीप सावंत, श्री. सुधाकर तांबोळी, सौ. शीतल शेठ-देवरुखकर यांनीही सहभाग घेतला.

**श्री. रविकांत सांगुर्डे** यांनी डॉ. राजे, श्री. प्रदीप सावंत आणि सौ. शीतल शेठ-देवरुखकर यांच्या म्हणण्याला सहमती दर्शविताना, शेकडो कोटी रुपयांच्या बँकेत ठेवी ठेवण्याच्या बाबतीत उपकुलसचिव पदाच्या व्यक्तीला असे अधिकार द्यावेत का? असा प्रश्न उपस्थित करून पारदर्शकता ह्या तत्वाला आणि व्यवहाराला

महत्व असते, असे सुचविले. इथे पारदर्शकता दिसून येत नसल्याने हा विषय गुन्हा अन्वेषण किंवा CBI सारख्या विभागाकडे सोपविला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. श्री. राजन कोळंबेकर यांनी ₹ ७०० कोटींची गुंतवणूक बँकेमध्ये कशाप्रकारे करण्यात आली याची विचारणा केली. श्री. प्रदीप सावंत आणि श्री. सुधाकर तांबोळी यांनीही याच मुद्यावर सविस्तरपणे बोलताना संबंधित प्रकरणी प्रत्यक्ष सहभागी असणाऱ्या कर्मचार्यांना त्या विभागापासून दूर ठेवावे, अशी मागणी केली.

सदर समितीचे सदस्य राहिलेल्या श्री. सुधाकर तांबोळी यांनी अहवालामध्ये शिफारस केलेल्या मुद्यांवर बोलताना या संदर्भातील पुरावे नष्ट होवू नयेत याची काळजी घेतली पाहिजे, असे सांगितले.

**डॉ. सुप्रिया करंडे** यांनी संगीतले की, ज्या कर्मचाऱ्यांनी कोविड-१९ च्या काळामध्ये प्रतिकूल परिस्थितीमध्ये काम केले आहे अशा सुरक्षा रक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांचा पण पुरस्कार देताना विचार व्हावयास हवा होता तसेच त्या संदर्भात अर्ज मागविले असते आणि एक थोडीशी व्यापक प्रक्रिया अनुसरली असती तर चांगले कर्मचारी निवडता आले असते.

**श्री. प्रवीण पाटकर** या विषयावर भाष्य करताना म्हणाले की, सर्वसाधारण प्रशासन व्यवस्थेमध्ये प्रामाणिक आणि भ्रष्ट अशा दोन्ही प्रकारच्या व्यक्ती असल्या तरी परीक्षेसह अनेक महत्वाच्या विभागांमध्ये खूप लक्ष घालण्याची गरज प्रतिपादन केली. अशा प्रकारचा अंदाज आला तेव्हाच काळजी घ्यायला हवी होती. माहिती तंत्रज्ञान आणि इमारत देखभाल या विभागांमध्ये सल्लागारही नेमलेले नाहीत हे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

**डॉ. निशा मुनी** यांनी हा विषय गहन आहे हे सांगताना ५ महिने झाले तरी मुदतठेवींच्या प्रकरणात काही निर्णय झालेला नाही, सदस्यांची मते आणि त्यांची कळकळ सगळ्यांनी समजून घेतली पाहिजे. मुदतठेवींच्या प्रकरणात चौकशी समितीमध्ये काम केलेले श्री. धनेश सावंत यांनी गुणवंत कर्मचारी पुरस्कार देण्याची प्रक्रिया इतर काही ठिकाणाहून समजून घेवून तसे पुरस्कार जाहीर करायला हवेत आणि दोषींवर सक्त कारवाई करायला हवी अर्थात त्याआधी कायदेशीर सल्ला घेणेही आवश्यक असल्याचे सांगितले.

**डॉ. धनराज कोहचाडे** यांनी आर्थिक घोटाळ्याचा धागा पकडून मुंबईतील रिझवी महाविद्यालयामध्ये कशा रीतीने हॉटेल मनेजमेंट आणि टुरिझम हे अभ्यासक्रम बेकायदेशीरपणे सुरु करण्यात आले आहेत आणि विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागातही आदिवासी संशोधनासंदर्भात आदिवासी लोकांनीच केलेल्या तक्रारींचा मुद्दाही उपस्थित केला.

**श्री. प्रदीप सावंत** यांनी विद्यापीठाच्या मुदत ठेवी प्रकरणाचा कालावधी हा २००३ ते २०१८ असा मोठा कालावधी असल्याचे सांगितले. अशा प्रकरणामध्ये खबरदारी म्हणून नवीन अचारसंहिता तयार करण्याची अत्यंत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन श्रीमती शिल्पा पटवर्धन यांनी केले. पुरस्कार इच्छुक व्यक्तींकडून फॉर्म भरून घेताना त्यांच्या पुर्वेतीहासाचीही माहिती प्राप्त करावी म्हणजे कामातील शिस्त आणि कामाची नोंद घेऊन योग्य व्यक्तीला पुरस्कार देता येईल, असेही सुचविले.

**श्री. संजय शेटे** यांनी समिती अहवालाबाबत सविस्तर भाष्य केले. समितीने संबंधित विभागाला ३ वेळा भेट देवून आवश्यक कागदपत्रे ताब्यात घेतली. विद्यापीठाचा निधी कुठल्या बँकेत ठेवावा यासंदर्भात आधीच समिती स्थापन करण्यात आली होती आणि आचारसंहिताही बनविण्यात आली होती आणि त्यामध्ये राष्ट्रीयकृत बँका, कोटक महिंद्रा बँक, आय.सी.आय.सी.आय. बँक, ॲक्सिस बँक यांची शिफारस यादी प्रसिद्ध करण्यात आली होती, परंतु येस बँकेचा त्यामध्ये कुठेही उल्लेख नव्हता. ₹ १४० कोटींची गुंतवणूक केलेली बँक बंद झाली तरीही संबंधित विभागाने कळविले नाही. अर्थात आरबीआयच्या सहकार्यामुळे ₹ ७६ कोटी परत मिळविण्यात समितीला यश आले. अलीकडे शासनाचे असे निर्देश आलेले होते की, पगाराव्यतिरिक्त कुठलेही देयके अदा करू नयेत; परंतु संबंधित विभागाने त्याचे पालन केले नाही. त्यामुळे अशा गैरकृत्यांना जबाबदार असणाऱ्या व्यक्तींना तातडीने निलंबित करणे आवश्यक होते तसेच शासनामार्फत आलेल्या वित्त विभागातल्या अधिकाऱ्याला शासन सेवेत परत पाठविले पाहिजे, असे सांगितले.

**श्री. रविकांत सांगुर्डे** यांनीही याला सहमती देताना गेल्या अनेक वर्षांचे ऑडीट झालेले नसल्याने विद्यापीठाने अत्यंत सतर्क राहिले पाहिजे, तसेच वित्त व लेखा अधिकारी हा सी.ए. असला पाहिजे अशीही अपेक्षा व्यक्त केली.

या चर्चेदरम्यान ॲड. वैभव थोरात यांनी कोरोना काळात महाविद्यालयांनी विकास निधी विद्यार्थ्यांकडून घेण्यात येवू नये, असा मुद्दा मांडला.

**ॲड. निल हेळेकर** यांनी मूळ विषयावर बोलताना कर्मचारी सेवाशर्ती ('सर्व्हिस लॉ') मध्ये जी तरतूद आहे, त्याप्रमाणे योग्य ती कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी केली.

**प्रा. तुषार देसाई** यांनी कोरोना काळात खर्चाला कात्री लावण्याच्या संदर्भातल्या उपाययोजना केल्या होत्या का? अशी विचारणा केली. त्याचप्रमाणे नियमित प्रकल्पही नियोजित वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. कशाला प्राथमिकता द्यायची याचाही विचार झाला पाहिजे, असे सुचविले.

एकरूप परिनियमाप्रमाणे अधिसभा बैठकीनंतर कार्यवृत्त हे एक महिन्याच्या आत पाठविले जाणे आवश्यक असून त्यामध्ये योग्य त्या सुधारणा करून १५ दिवसात कुलसचिवांमार्फत त्याला अंतिम स्वरूप प्राप्त होईल अशी कार्यप्रणाली अनुसरावी, अशी सूचना डॉ. गुलाबराव राजे यांनी केली.

विद्यापीठामध्ये पारदर्शक कारभारावर अधिक भर देण्यात येत असून विद्यापीठाची व्याप्ती मोठी असल्याने विद्यापीठ प्रशासन, वित्त व लेखा विभागात निश्चित तंत्रज्ञानाचाही उपयोग करून प्रशासन सुरळीत करण्याचे प्रयत्न करण्यात येतील असे मा. कुलगुरुंनी सांगितले.

बाहेरून एखादी माहिती तंत्रज्ञानाची तज्ज्ञ मंडळी बोलवण्यात येतील. येस बँकेच्या ठेवीच्या संदर्भात जी दुर्दैवी परिस्थिती निर्माण झाली आहे तिथे हा प्रकार अनेक वर्ष सुरु होता, हे ही लक्षात आलेले आहे. या प्रकरणी चांगल्या वकिलाचा सल्ला घेतला जाईल आणि या प्रकरणाच्या मुळापर्यंत जाऊन शोध घेण्यात येईल.

गुणवंत कर्मचारी पुरस्काराच्या प्रक्रियेमध्ये अनेक त्रुटी आहेत त्या दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. बँक ठेवीच्या प्रकरणामध्ये लगेचच सावधगिरी बाळगून इतर सर्व निधी राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्यात आलेले आहेत. मिडीयाला आजच्या सभेसाठी निमंत्रित केलेले नाही, ही गोष्ट लक्षात आणून दिलेली आहे; परंतू आवश्यक ती माहिती वृत्तपत्र व प्रसार माध्यमांपर्यंत पाठविली जाईल.

**मा. कुलगुरुंनी** आश्वासन दिले की, वित्त व लेखा विभागासह अन्य प्रशासकीय विभागांमध्ये बदल्यांचे धोरण योग्यप्रकारे राबविण्यात येईल. अंतर्गत नियंत्रण प्रणालीही प्रत्येक ठिकाणी आवश्यक असून त्यासाठी तज्ज्ञ लोकांच्या नेमणुका कराव्या लागतील, कारण बदलत्या तंत्रज्ञानाचे ज्ञान आपल्यापैकी अनेक लोकांना नसल्याने हा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेपुढे मांडून काही नेमणुका तातडीने कराव्या लागतील. एटीआर हा अधिसभेत मिळाला पाहिजे त्यादृष्टीने मा. कुलगुरुंनी कुलसचिवांना निर्देश दिले. गुणवंत कर्मचारी निवडताना त्यामध्ये सुरक्षा रक्षकांनाही सामावून घेतले जाईल अर्थात ह्या पुरस्कार निवडीमध्ये सर्व विभागाचा समावेश केला जाईल. अंतर्गत लेखा परिक्षण, लेखा परिक्षकाच्या माध्यमातून होईल. रिझवी कॉलेजच्या तक्रारीसंबंधी मा. शिक्षणमंत्र्यांनी दखल घेतली असून याची सखोल चौकशी करून योग्य तो निर्णय घेतला जाईल. "अर्थशास्त्र विभाग आणि आदिवासी विभागाकडून आलेल्या तक्रारीमध्ये प्र-कुलगुरू लक्ष घालून तक्रारींचे निवारण करतील".

**श्री. संजय शेटे** यांनी केलेल्या मौलिक सूचनांचा उल्लेख करून मा. कुलगुरूंनी तपशीलवार भाष्य केले. नवीन कायद्याप्रमाणे सनदी लेखापालांची नेमणूक करणे गरजेचे आहे त्यासाठी विद्यापीठाने शासनाकडे आधीच पत्रव्यवहार केला असून कुलसचिव आणि इतर नेमणुकांच्या बाबतीतही अशीच विनंती करण्यात

आल्याचे मा. कुलगुरुंनी सांगितले. कोरोना काळात अर्थसंकल्पाप्रमाणे खर्च होणार नाही असेही त्यांनी स्पष्ट केले आणि आवश्यक त्या ठिकाणीच खर्च करायला संबंधित विभागाला निर्देश दिले असल्याचे नमूद केले.

**प्रा. सुरेश मैंद** यांनी शिक्षकांच्या जागा भरण्यासाठी जाहिरातीचा मुद्दा उपस्थित केला होता त्यावर बोलताना कुलगुरू म्हणाले की, रोस्टरचे काम झाले की, दोन-तीन महिन्यांमध्ये प्रक्रिया पूर्ण होईल.

**श्री. महादेव जगताप** यांनी कर्मचार्यांना एमसीएसआर लागू आहे का? असा मुद्दा उपस्थित केला होता. त्याबद्दल कुलगुरू म्हणाले की, एखादा कर्मचारी शासनाकडून आला तरी कारणे दाखवा नोटीस देवू शकतो आणि काही कारवाई करायची असेल तर तसे शासनाला कळविले जाईल, त्यामध्ये दोन अधिकाऱ्यांना नोटीसीसाठी १५ दिवसांचा वेळ दिलेला आहे अशीही माहिती दिली. श्री. सुधाकर तांबोळी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नास उत्तर देताना कुलगुरू म्हणाले की, अंतिम अहवाल येईपर्यंत थांबायला पाहिजे, असे कायदेशीर सल्ला सांगतो याचाही उल्लेख केला.

**श्री. प्रदीप सावंत**, श्री. सुधाकर तांबोळी, श्री. शशिकांत झोरे आणि श्री. महादेव जगताप यांच्या प्रश्नांना सविस्तर उत्तर देताना मा. कुलगुरूंनी प्रथम अहवाल आला असला तरी अंतिम अहवाल आल्याशिवाय आपण संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करू शकणार नाही हे पुन्हा पुन्हा सांगितले. तथापि श्री. रविकांत सांगुर्डे, श्री. महादेव जगताप, यांनी गुन्हा दाखल करण्याबाबत आग्रहच धरला त्यानंतर मा. कुलगुरूंनी सविस्तर निवेदन करताना सांगितले की, कायदेशीर कारवाई करण्यात येईल. यामध्ये काही लपवण्याचा प्रकार नाही हेही स्पष्ट केले आणि योग्य तो सल्ला घेवून या प्रकणाच्या मुळाशी जाणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

**प्रा. डी. पी. मेहता** म्हणाले की, आर्थिक गुन्हा झाला आहे, हे सकृतदर्शनी दाखवून द्यावे लागते नुसता गुन्हा घडल्याचा देखावा करून चालणार नाही. श्री. संजय शेटे यांनीही पैसे परत मिळत आहेत तर आर्थिक गुन्हाशाखेचा हा विषय होणार नाही, त्यामुळे कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करावयाची हा आपला अंतर्गत विषय आहे.

**ॲड. निल हेळेकर** यांनीही सांगितले की, आरोप हे नि:संशय सिद्ध करण्याची जबाबदारी आपली आहे ते राहून गेले तर विद्यापीठाची नाचक्की होईल. व्यवस्थापन परिषदेपुढे हा विषय ठेवून निर्णय घ्यावा.

मा. कुलगुरुंनी ॲड. निल हेळेकर आणि श्री. प्रदीप सावंत यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यास अनुसरून सांगितले की, संबंधित कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई होईल आणि सदरहू कर्मचारी सेवानिवृत्त होणार असला तरी त्याचे मिळणारे फायदेही थांबिवले जातील.

**प्रा. वैभव नरवडे** यांनी अल्केश-दिनेश मोदी या संस्थेमधील प्राध्यापिकेला कार्यभार का दिला जात नाही? याविषयी प्रश्न उपस्थित केला. प्र-कुलगुरूंनी संबंधित प्राध्यापिकेला कार्यभार देणेबाबतचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे सांगितले. स्थलांतरण प्रमाणपत्र ऑनलाईन मिळावे ही सदस्यांची मागणी कुलगुरुंनी मान्य केली.

**सौ. शीतल शेठ-देवरुखकर** यांनी कार्यवाही अहवालाचा मुद्दा उपस्थित केला आणि तो सर्व सदस्यांना मिळावा अशी मागणी केली.

मा. कुलगुरुंनी झालेली दिरंगाई मान्य केली व केवळ १५ % कर्मचाऱ्यांवर विद्यापीठाचे काम सुरु असल्याचे सांगितले. कार्यवाही अहवाल नंतर देण्यात येईल, असे आश्वासन सभागृहाला दिले.

**श्री. सुधाकर तांबोळी** यांनी भाईंदरमधील अभिनव महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या थांबलेल्या पगाराचा प्रश्न उपस्थित करून चौकशी समितीच्या अहवालाचा आग्रह धरला. डॉ. गुलाबराव राजे यांनीही महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याप्रमाणे मा. कुलगुरूंना विशेष अधिकार प्रदान केलेले असून व्यवस्थापन परिषदेचा ठराव शासनाकडे पाठवू शकतो, असे सांगितले.

यावर सदस्यांना मधेच थांबवून प्र-कुलगुरूंनी यासंदर्भात सर्व चर्चा झालेली असून अभिनव महाविद्यलय, भाईंदरची चौकशी समिती २ वेळा बदलावी लागली असे सांगितले.

सह-संचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी सभेला गैरहजर असल्याबाबत सदस्यांनी नाराजी व्यक्त केली.

प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी मुंबई विद्यापीठात जवळ-जवळ २८ अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील शिक्षकांना / कर्मचार्यांना वेतन न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याचे निदर्शनास आणले व सदर महाविद्यालयामधील शिक्षकांना आणि कर्मचार्यांना वेतन मिळावे अशी मागणी केली. याबाबत कुलगुरू म्हणाले की, संचालकांमार्फत प्रयत्न करून वेतन मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

अभिनव महाविद्यालय, भाईंदरच्या प्राध्यापकांना गेली अनेक महिन्यांपासून वेतन मिळत नाही असे सांगत डॉ. राजे यांनी यासंदर्भात विस्तृत भाष्य केले. जेव्हा शासन एखाद्या संस्थेला अनुदान मंजूर करते तेव्हा ते सबंधित व्यक्तींपर्यंत पोहचणे महत्वाचे असते जर याचे उल्लंघन होत असेल तर अशा संस्थेवर कडक कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. वेळेवर वेतन न मिळाल्यामुळे अनेकांना मानसिक आजाराचा सामना करावा लागत असून प्राचार्य आणि व्यवस्थापन यांच्या चुकीमुळे प्राध्यापकांना झळ सोसावी लागत आहे. त्यामुळे तातडीने त्यांचे वेतन अदा करणे गरजेचे आहे असे, आग्रही प्रतिपादन डॉ. राजे यांनी विद्यापीठ आणि सह-संचालकांना केले. सदर महाविद्यालय पनवेल विभागात येत असल्याचे

निदर्शनाला आणून संबंधित सह-संचालकांशी चर्चा करण्यात येईल, असे मुंबई विभागाचे सह-संचालक डॉ. मलघे यांनी सांगितले.

वेतन अनुदान केवळ महाविद्यालयाच्या खात्यावर जमा करून चालणार नाही तर प्रत्येक कर्मचाऱ्याच्या खात्यावर जमा झाले पाहिजे आणि संबंधित महाविद्यालयाची समितीमार्फत चौकशीही झाली आहे आणि संबंधित महाविद्यालयावर प्रशासकच नेमला पाहिजे, असे श्री. सुधाकर तांबोळी म्हणाले.

पनवेल सहसंचालक डॉ. जगताप यांच्याशी थेट संपर्क साधून हा प्रश्न मार्गी लावावा असे आवाहन श्री. प्रदीप सावंत यांनी केले.

मा. प्र-कुलगुरू यांनी सांगितले की, १७ मे, २०२० ला अहवाल प्राप्त झाल्यानंतर लगेचच २१ मे २०२० रोजी पनवेल सहसंचालकांना त्याची माहिती देण्यात आली आणि तिथून पुढे संचालक, पुणे यांचेकडेही त्याची माहिती गेलेली आहे. एवढेच नाही तर त्यांच्याशी ते स्वतः आणि कुलगुरू बोललेले आहेत असे स्वतः प्र-कुलगुरूंनी सभागृहात निवेदन केले. तथापि, पनवेल विभागाकडून संचालकांना वेतन जमा करण्याबाबत विनंती करण्यात आलेली होती; परंतु संचालकांनी ते मंजूर केलेले नाही; उलट संबंधित महाविद्यालयावर प्रशासक नेमण्याचा प्रस्ताव मंत्रालयात पाठवून दिला आहे अशी नवीनच माहिती डॉ. राजे यांनी सभागृहात दिली आणि व्यवस्थापन परिषदेमध्ये वेतन जमा करण्याबाबत ठराव केल्यास हा प्रश्न सुटू शकेल असे सांगितले. त्यामुळे कलम १२(१५) चा वापर विद्यापीठाने करून यावर तोडगा काढावा अशी विनंती डॉ. राजे यांनी केली.

सदर चर्चा सुरु असताना प्राचार्य मोहम्मद ताहीर यांनी सिद्धार्थ महाविद्याच्या अशाच घटनेची आठवण करून देत, विद्यापीठाने एका वरिष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक करून त्यांना वेतन इत्यादी पत्रकांवर स्वाक्षरी करण्याचे अधिकार द्यावेत म्हणजे हा प्रश्न सुटू शकेल, असे सांगितले. या चर्चेमध्ये अधिकची माहिती सांगताना प्राचार्यांची एकट्याची स्वाक्षरी आवश्यक असताना महाविद्यालयाचे व्यवस्थापन अशा दोघांचे असे संयुक्त खाते चालू ठेवते ते अयोग्य आहे, असे श्री. सुधाकर तांबोळी आणि डॉ. राजे यांनी निदर्शनाला आणून दिले. डॉ. रसाळ यांनीही प्राचार्यांच्या एकट्याच्या स्वाक्षरीनेच खात्याचे व्यवहार झाले पाहिजेत. हा नियम पाळला जात नाही हे सांगितले. सदर चर्चेला पूर्ण विराम देण्याच्यादृष्टीने प्र-कुलगुरूंनी सदर विषय हा व्यवस्थापन समितीमध्ये पुढच्या बैठकीत घेतला जाईल, असे आश्वासन सभागृहाला दिले. त्यावर सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

कुलगुरूंनी कुलसचिवांना सांगितले की, महाविद्यालयाच्या वेतन खात्यावर फक्त प्राचार्यांची स्वाक्षरी अथवा संयुक्त स्वाक्षरी असणे आवश्यक आहे काय? हे तपासून याबाबत परिपत्रक काढावे, असे निर्देश दिले.

**श्री. धनेश सावंत** यांनी विद्यापीठ शिक्षकांच्या कॅस (CAS) च्या प्रलंबित प्रश्नासंबंधी विचारणा केली. प्राध्यापकाचे कॅस दोन वर्षांपूर्वी होऊनही त्यांना वाढीव वेतन मिळण्यासाठी संबंधित विभागाकडून सह-संचालकांच्या मंजुरीसाठी ठसा मारून पाठवावे लागते, परंतू इथे असे होत नाही काहींच्या बाबतीत मुद्दाम विलंब लावला जातो त्यामुळे शिक्षकांमध्ये एका प्रकारची अस्वस्थता निर्माण झालेली आहे. त्यामुळे शिक्षकांना अशा फायद्यापासून वंचित ठेवणे योग्य नाही, याचा पुनःरुच्चार केला.

**श्री. धनेश सावंत** ह्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना कुलगुरूंनी तपशिलावर भाष्य केले. त्यांनी सांगितले की, २०१८ मध्ये कॅसच्या मुलाखती होत्या आणि सदर मुलाखतीच्या समितीमध्ये शिक्षण संचालकांच्या प्रतिनिधीने २०१३-१४ मध्ये झालेल्या शिक्षक मुलाखतीमध्ये शासनाचा प्रतिनिधी उपस्थित नसल्याने शासनाने २० प्रकरणात आक्षेप नोंदवला आहे. मात्र प्रधान सचिव पातळीवर हा विषय हाताळून आता ते पूर्णत्वास आलेले आहे. त्याचप्रमाणे काही प्रकरणात कॅसपूर्वीच्या नोंदी, कागदपत्रे आवश्यक होती त्यामुळे हा विलंब झालेला आहे. विद्यापीठ कॅस अंतर्गत बढतीची प्रकरणे नियोजित करत असल्याचे सांगितले आणि ती सर्व काही महिन्यामध्ये पूर्ण होतील असे आश्वासन दिले.

**डॉ. सुरेश मैंद** यांनी प्र-कुलगुरूंनी सदर प्रकरणात लक्ष घालून पूर्णत्वास नेल्याबद्दल आभार मानतानाच उर्वरित प्रकरणांचाही निपटारा लवकर व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. विद्यापीठाची २० ते ३० पेन्शनची प्रकरणं अजून प्रलंबित असल्याचे दिसून आले ज्यामध्ये ४ वर्षे जुन्या प्रकरणांचाही समावेश आहे.

**श्री. महादेव जगताप** यांनी शिक्षण सह-संचालकासोबत बैठक घेवून विद्यापीठाच्या कोण व्यक्ती जबाबदार आहेत ते जाहीर करा, अशी मागणी केली. प्र-कुलगुरु यांनी ह्या संदर्भात माहिती देण्याबाबत सह-संचालक श्री. मलघे यांना सांगितले त्यावर सहसंचालकांनी सांगितले की ज्या फाइल्स स्वयंस्पष्ट होत्या त्या आपण तातडीने पूर्ण करून पाठवून दिल्या आहेत; परंतु सहसंचालकंच्या अनुपस्थितीमुळे काही प्रकरणे प्रलंबित राहिली आहेत. समितीमध्ये सहसंचालकाची उपस्थिती अनिवार्य असल्याने शासनस्तरावर अशा नस्ती प्रलंबित आहेत. ह्यापुढे विद्यापीठामधल्या कॅस समितीमध्ये सहसंचालकाचा प्रतिनिधी हजर राहील ह्याची काळजी घेऊ आणि ह्यापुढे असे होणार नाही असे विद्यापीठाकडून शासनाला सांगण्यात आलेले आहे. तसेच शासनाला या संदर्भात अजून कॅसच्या केसेस आहेत हे निदर्शनास आणून द्यावे लागेल. आपल्याकडे अशी ३३ प्रकरणे बाकी आहेत असे सहसंचालकांनी सांगितले.

या सर्व चर्चेअंती प्र-कुलगुरूंनी प्रा. सुरेश मैंद आणि प्रा. मृदुल निळे ह्यांनी शिक्षण सहसंचालाकांबरोबर बैठक घेवून सेक्रेटरींना अशा रितीने पत्र पाठवायचं ते नक्की करावे असे आवाहन केले. ह्याच विषयाला अनुसरून प्रा. अनंत लोखंडे यांनी विद्यापीठ प्रशासनाला महाराष्ट्र शासनाच्या १४ ऑगस्टच्या पत्राची आठवण

करून दिली. सदर पत्रात महाराष्ट्र शासनाने सूचना केल्यानुसार दर महिन्याला ठराविक दिवशी कॅसच्या बैठकीचे आयोजन करावे आणि प्रकरणांचा निपटारा करावा, त्यावर विद्यापीठाने काय कार्यवाही केली? असा प्रश्न केला.

**प्रा. अनंत लोखंडे** यांनी एस.पी. महाविद्यालयाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे दिली जात नाहीत, असे निदर्शनास आणले.

कुलगुरूंच्या परवानगीने उत्तर देताना प्र-कुलगुरू म्हणाले की, मुंबई विद्यापीठाने आता शाखानिहाय समित्या स्थापन केल्या असून विद्यापीठ विभागांनाही याबाबत सूचित आणि सतर्क केले आहे. त्यामुळे आता ह्या समित्या संबंधितांचे API तपासून देईल आणि कॅसचे काम अधिक गतिमान होईल अशी माहिती देवून संबंधितांच्या शंकांचे निरसन केले.

इतिवृत्तामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

१) पृष्ठ क्र. ८ परीच्छेद २ ओळ क्र. ५ मध्ये प्रा. वैभव नरवडे यांच्या ऐवजी ॲड. वैभव थोरात असे वाचावे.

२) पृष्ठ क्र.१९ मध्ये परीच्छेद ३ असा खालील परीच्छेदाचा समावेश करावा.

"डॉ. मृदुल निळे यांनी मोतीलाल झुनझुनवाला महाविद्यालयातील प्राध्यापक अमर कडाळे यांना चुकीच्या पद्धतीने निलंबन केल्याचा मुद्दा उपस्थित केला आणि व्यवस्थापनावर कारवाईची मागणी केली."

उपरोक्त दुरुस्ती व सूचनांसह इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

**बाब क्र. २ : प्रश्नोत्तराचा तास**

अधिसभा सदस्यांनी प्रश्नोत्तराच्या तासाकरिता पाठविलेल्या सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे त्यांना आधीच लिखीत स्वरुपात देण्यात आलेली असल्याने व प्रश्नोत्तराच्या तासामध्ये एकही उपप्रश्न विचारला नसल्याने प्रश्नोत्तराचा तास संपल्याचे जाहीर करण्यात आले.

अध्यक्षांच्या परवानगीने कुलसचिवांनी सभा भोजनासाठी स्थगित केल्याचे घोषित केले. भोजनानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

प्र-कुलगुरुंनी महाराष्ट्र विद्यापीठ परिनियम क्र. ४ २०१९ चा दाखला देत सकाळी १० ते १२ दरम्यान इमेलवर आलेल्या प्रस्तावांची उत्तरे देऊ, असे सुचविले. ह्यावर श्री. सुधाकर तांबोळी व श्री. प्रदीप सावंत यांनी आक्षेप घेतला असता ॲड. हेळेकर यांनी परिनियमामध्ये 'स्थगन' शब्दच नसल्याचे सांगितले. ह्याला स्थगन म्हणू नका हे प्रश्न स्वरुपातच आहे त्यांना आपण उत्तर देवू असे कुलगुरुंनी सभागृहाला सांगितले.

सभागृहामध्ये परिनियम ४ च्या अनुषंगाने क्रमांक 10 (८) या कलमावर चर्चा झाली. या चर्चेत श्री. प्रदीप सावंत, श्री. राजन कोळंबेकर, श्री.सुधाकर तांबोळी, ॲड. हेळेकर यांनी भाग घेतला, कुलसचिवांनी प्राध्यापक चंद्रशेखर कुलकर्णी यांना त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडण्यास सांगितले.

**प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी** यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस श्री. रविकांत सांगुर्डे यांनी अनुमोदन दिले.

१ स्थगन प्रस्ताव .

"This Motion is moved to invite urgent attention of the House to discuss the present failure of University Administration on numerous fronts and instances of gross violation of statutes and norms and University Act causing grave hardship to teachers, non-teaching staff and students in the affiliated colleges."

आपला स्थगन प्रस्ताव मांडताना प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मध्ये अस्तित्वात येऊनही आपल्या विद्यापीठात त्याची योग्यप्रकारे अंमलबजावणी झाली नाही; आधी झालेल्या अधिसभा मधील सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पाहिली तर परिनियम व विद्यापीठ कायद्यातील तरतुदी या तंतोतंत अमलात आलेल्या दिसून येत नाही; प्रामुख्याने या गोष्टी संलग्नता विभाग व महाविद्यालयीन शिक्षक मान्यता विभाग यांच्याशी निगडित आहेत. यामध्ये चुकीच्या पद्धतीने, प्रभारी प्राचार्य तसेच प्राध्यापक नेमणुकीबाबत केलेल्या मान्यता यांचा त्यांनी उल्लेख केला. प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी RKT महाविद्यालयाचे उदाहरण देत सांगितले की, RKT महाविद्यालयात अतिरिक्त शिक्षकास प्राचार्य पदाचा कार्यभार परस्पर परिनियमाला डावलून देण्यात आला, या विषयावर पांघरूण घालण्याचे काम आपल्या महाविद्यालयीन शिक्षक नियुक्ती मान्यता विभाग विभागाने केल्याचा आरोपही त्यांनी केला. याच बरोबर संशोधन विभागात अनागोंदी असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले; प्रामुख्याने अभियांत्रिकी विषयात पात्रता नसतानाही मार्गदर्शकांची मान्यता मिळाल्याची उदाहरणे दिसून येतात; तक्रार निवारण समितीचे आदेश न पाळणे, विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी दिलेले आदेश न पाळणे; या बाबींचा पाठपुरावा संलग्नता विभाग करत नाही तसेच मागासवर्गीय प्राध्यापकांवर झालेल्या अन्यायाच्या संदर्भातही विभाग तत्परता दाखवत नाहीत. तद्नंतर प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी श्री. अमर कडाळे केस तसेच अन्य संदर्भात दाखला देऊन संबंधित दोन्ही विभागाकडून काही पाठपुरावा झालेला नाही त्यामुळे संलग्नता विभागांची सखोल चौकशी करण्यात यावी व त्या संदर्भात कुलगुरू यांनी अधिसभा सदस्यांचा सहभाग असलेली समिती गठीत करावी, अशी सूचनावजा मागणी त्यांनी केली.

प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत खुलासा करताना प्र-कुलगुरू यांनी विद्यापीठाच्या प्रशासनात / व्यवस्थापनात अमुलाग्र बदल करण्यास सुरुवात केली असल्याचे सांगितले. विद्यापीठातील अधिष्ठातांच्या अध्यक्षतेखाली चार समित्या गठीत करण्यात आल्या असून प्रामुख्याने शैक्षणिक गुणवत्ता निर्देशांक (API) तपासणे व जलद गतीने CAS प्रकरणांचा निपटारा करणे; संशोधन मान्यता समितीच्या बाबतीमध्ये वेगवेगळ्या विभागांकडे वेगवेगळी कामे सुपूर्द करणे, सर्वांचे सुसूत्रीकरण करणे, ई-प्रक्रिया सुरु आहेत; याचबरोबर M.Phil व Phd प्रबंध एकाच विभागाकडे येतील अशी प्रणाली निर्माण करत आहोत; लवकरच या मध्ये झालेल्या सुधारणा दिसून येतील, असे सांगितले.

**प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी** यांनी सोमय्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने स्वतःलाच विद्यापीठापासून विभक्त करून घेतले असून प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे त्यांनी स्वतःच्या अभिमत विद्यापीठांमधून करणे सुरु केले आहे; जर या प्रकारच्या गोष्टी आपण चालवून घेऊ लागलो तर तो एक चुकीचा पायंडा पडेल, असे ते म्हणाले. प्रत्येक संशोधन मार्गदर्शकासाठी आठ विद्यार्थ्यांची मर्यादा आपण जरी घालून दिली असली तरी सदरहू मार्गदर्शक हे दुसऱ्या विद्यापीठातही मार्गदर्शक म्हणून कार्यरत असतात व यासाठी ना हरकत प्रमाणपत्र ही विद्यापीठाकडून घेतलेले नसते हा एक चुकीचा पायंडा पडत आहे, असे सांगितले.

वरिल प्रस्तावाला अनुमोदन देताना **श्री. रविकांत सांगुर्डे** यांनी महाविद्यालयांकडून नियमांची सरसकट पायमल्लीचा उल्लेख करताना एस. पी. डी. टी. कॉलेज मध्ये विद्यापीठाची एफ.वाय.बी.ए. ची तुकडी बंद करण्याचे कारस्थान सुरु आहे व तेथे प्राचार्य हे प्राध्यापकांना धमकी देत आहेत की, ते बीए च्या तुकड्या बंद करून टाकणार आहे; यासंदर्भातील समितीचा अहवाल विद्यापीठाला प्राप्त झाला असून कुठलीही कारवाई या महाविद्यालयावर केली गेली नाही. याचबरोबर अभियांत्रिकी महाविद्यालयात बायो-मेडिकलचा अभ्यासक्रम विद्यापीठाच्या परवानगीशिवाय बंद करून परस्पर अखिल भारतीय तंत्र विज्ञान परिषदेची परवानगी घेऊन आर्टिफिशिअल इंटेलिजन्स हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे; या सर्व गोष्टींमुळे एक चुकीचा पायंडा पडत आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये जादा तुकड्या विद्यापीठाच्या परवानगीशिवाय चालू असून त्यात थडोमल शहानी महाविद्यालयाचादेखील समावेश असून इव्हेंट मॅनेजमेंटचा अभ्यासक्रमदेखील विद्यापीठाच्या परवानगीशिवाय परस्पर AICTE च्या मान्यतेने सुरु करण्यात आला. विद्यापीठ परिनियम व अधिनियमांचे उल्लंघन होत असल्याचे सांगत SPDT महाविद्यालयाच्या SYBA ची तुकडी बंद करण्याबाबतचा दाखला देऊन ह्यासंबंधी समितीने विद्यापीठास अहवाल सादर केला असून प्र-कुलगुरुंनी ह्याबाबत खुलासा करावा, अशी मागणी केली. SPDT महाविद्यालयाच्या प्राचार्या त्रिशला मेहता ह्या शिक्षकांना सरळ सरळ B.A. चे अनुदानित अभ्यासक्रमाचे वर्ग बंद करून टाकण्याची धमकी देत असतील तर ही बाब गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

SPDT आणि थडोमल शहानी महाविद्यालयावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी श्री. सांगुर्डे यांनी केली.

RKT, उल्हासनगर आणि MMK महाविद्यालयामधील अतिरिक्त शिक्षकांना सरळ प्रभारी प्राचार्य पदावर नेमणूक केल्याबद्दलचा प्रश्न उपस्थित केला त्यावर प्र-कुलगुरु म्हणाले की, ह्याबाबत ज्या-ज्या महाविद्यालयांबाबत तक्रारी आल्या आहेत त्या त्या महाविद्यालयांवर आणि संबंधित प्राचार्यांवर विद्यापीठाकडून उचित कार्यवाही होईल.

**श्री. प्रदीप सावंत** यांनी महाविद्यालय बंद करण्याबाबत मार्गदर्शिका बनविण्याबाबत गठीत केलेल्या समितीबद्दल माहिती देण्याची विनंती केली. बरेच स्वायत्त महाविद्यालये अभ्यासक्रम बंद करण्याकरिता विद्यापीठाची परवानगी घेत नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. विद्यापीठाशी निगडीत असलेले अभ्यासक्रम तिथे आपोआप बंद होत आहेत तर त्याची विद्यापीठाने काही दखल घेतली आहे का ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. ह्यावर प्र-कुलगुरुंनी खुलासा केला की, अभ्यासक्रम बंद करण्याबाबत मार्गदर्शिका बनविण्याबाबत गठीत केलेल्या समितीची मार्गदर्शक तत्वे लवकरच व्यवस्थापन परिषदेत ठेवण्यात येतील.

हरकतीचा मुद्दा उपस्थित करून श्री.प्रदीप सावंत यांनी प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया चालू असून जर विद्यापीठाची परवानगी न घेता अभ्यासक्रम बंद करून नविन विद्यापीठ किंवा स्वायत्त महाविद्यालयातून प्रवेश प्रक्रिया पार पडल्यास त्याला जबाबदार कोण? असा गंभीर प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

**श्री. सुधाकर तांबोळी** यांनी विद्यापीठातील विविध विभागांमध्ये काम प्रामाणिकपणे होते का? असा प्रश्न उपस्थित केला. अनेक विभागात सहाय्यक कुलसचिव आणि उपकुलसचिव यांच्या बदल्या होत नाहीत. अनेक अधिकारी कर्मचारी २५ - २५ वर्षे एकाच विभागात सेवा करत आहेत. विद्यापीठ प्रशासनाने केलेल्या पुर्नरचनेबद्दल त्यांनी प्रशासनाचे अभिनंदन केले.

महाविद्यालयाची संख्या ३०० वरुन ८०० वर गेली आहे पण त्या प्रमाणात कर्मचारी वर्गाची संख्या वाढली नाही, असे प्र-कुलगुरुंनी सांगितले.

**श्री. महादेव जगताप** यांनी शासन स्तरावर मदत करण्याचे मान्य केले. परंतु आकृतीबंध तयार करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

**श्री. प्रदीप सावंत** यांनी महाविद्यालयीन शिक्षक मान्यता विभागात काही प्रकरणे लवकर मार्गी लागतात आणि काही प्रकरणांना एक ते दीड वर्ष लागते, त्यासंबंधी विचारणा केली.

**श्री. संजय शेटे** यांनी विद्यापीठासाठी चांगले काम करू इच्छिणाऱ्यांना समितीत घेण्याची सूचना केली.

एकरूप परिनियमांत स्थगन प्रस्ताव अथवा केवळ प्रस्ताव सादर करण्याची तरतूद आहे याबद्दल सदस्यांमध्ये आणि प्रशासनात मतभेद निर्माण झाले. काही सदस्यांच्या मते स्थगन प्रस्तावाची तरतूद आहे तर, प्रशासनाच्या आणि काही सदस्यांच्या मते केवळ प्रस्ताव सदर करण्याची तरतूद आहे.

**डॉ. गुलाबराव राजे** यांनी परिनियम क्र. ४ १०(८) कडे लक्ष वेधून "clear cut motion" असा शब्द वापरला आहे असे सांगितले. तसेच adjournment proposal आणि adjournment motion ह्यासंबंधी विश्लेषण करावे, अशी विनंती केली तसेच तक्रार निवारण यंत्रणा पूर्णपणे सक्रिय करावी, अशी विनंती केली. विद्यापीठ प्रशासनामुळे सिद्धार्थ महाविद्यालयाचे डॉ. बोस हे १९९६ पासून कार्यरत असताना त्यांना २०१४ पासून काढून टाकले आहे. वर्ष २०१४ पासून त्यांची तक्रार निवारण समितीकडे प्रलंबित आहे. डॉ. राजे यांनी सांगितले की, अनेक शिक्षक प्रभारी प्राचार्य पदावरदेखील कार्यरत आहेत.

**प्र-कुलगुरूंनी** त्यांच्या उत्तरात सांगितले की, तक्रार निवारण समितीवर माजी न्यायाधीश श्री. देशमुख यांची नेमणूक केली आहे. १५ दिवसांनी / महिन्यातून एकदा अशा नियमित बैठका घेऊन त्यांनी अनेक विषय मार्गी लावले आहेत. सद्य परिस्थितीत offline शक्य नसल्यास online पद्धतीने तक्रार निवारण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

**डॉ. राजे** यांनी वेंगुर्ला महाविद्यालय, देवगड महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य अनेक वर्ष कार्यरत असल्याची तक्रार केली.

**श्री. रविकांत सांगुर्डेनी** तळेरे येथील दळवी महाविद्यालयातील प्राध्यापकांना वेतन मिळत नसल्याचे निदर्शनास आणले.

**श्री. अनंत लोखंडे** यांनी देवगड महाविद्यातील प्राध्यापकांच्या छळवणुकीचा मुद्दा उपस्थित केला . त्याचबरोबर सदस्यांनी बँक खाती गोठवल्यामुळे सिद्धार्थ महाविद्यालयातील प्राध्यापकांना वेतन मिळत नसल्याची बाब सभागृहाच्या निदर्शनास आणली.

**श्री. मिलिंद सातम** यांनी देखील सिद्धार्थ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आणले.

प्र-कुलगुरूंनी सिद्धार्थ महाविद्यालयासंबंधी एक समिती गठन केल्याची माहिती सभागृहाला दिली आणि त्यांच्या सर्व समस्या आणि प्रश्न सर्वांशी चर्चा करून सोडवाव्यात अशा सूचना दिल्या असल्याचे सांगितले.

**ॲड. वैभव थोरात** यांनी समितीला एक वर्ष होऊन गेल्याचे सांगितले व सर्व समस्या प्रलंबित असल्याचे निदर्शनास आणले.

**कुलसचिवांनी** सांगितले की, सिद्धार्थ महाविद्यालयाला काही पूर्तता करण्याच्या सूचना दिल्या आहेत. प्राध्यापकांचे वेतन, विद्यार्थ्यांची फी आणि इतर गोष्टींचा यात समावेश आहे.

**ॲड. वैभव थोरात** यांनी सांगितले की, A Principal की, B Principal यांच्यात गोंधळ झाल्यामुळे बँक खाती गोठवली आहेत. तेथील कर्मचाऱ्यांनी कोणाला प्राचार्य म्हणायचे यावरून वादंग आहे आणि विद्यार्थी वर्ग त्यात पोळला जात आहे.

**कुलसचिवांनी** विद्यापीठाने कोणालाही प्राचार्य म्हणून मान्यता दिली नसल्याचे सांगितले.

**ॲड. हेळेकर** यांनी सिद्धार्थ महाविद्यालयाचे प्रकरण माननीय उच्च न्यायालयात प्रलंबित असल्याचे सांगितले.

**ॲड. वैभव थोरात** यांनी महाविद्यालयावर प्रशासक नेमता येऊ शकत नाही का? असा प्रश्न उपस्थित केला असता प्रकुलगुरूंनी स्पष्ट केले की, विद्यापीठ केवळ शिफारस करू शकते; परंतु हा निर्णय सर्वस्वी शासनाचा आहे.

सिद्धार्थ महाविद्यालयातील समस्याविषयी सर्व सदस्यांनी सविस्तर अतिशय गांभीर्यपूर्वक मते मांडली आणि चर्चा केली.

कुलगुरूंनी कुलसचिवांना सूचना केली की, सिद्धार्थ महाविद्यालयाबाबत सचिवांना सविस्तर पत्र देऊन मार्गदर्शन मागविण्यात यावे.

विद्यापीठासाठी पूर्णवेळ कायदा अधिकारी नेमण्याची मागणी काही अधिसभा सदस्यांनी केली. त्यावर प्र-कुलगुरुंनी वकिलांचे वेगळे पॅनेल असल्याचे सांगितले आणि विद्यापीठाचे कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड.गोखले काम बघतात, असे सांगितले. तसेच अभ्यासक्रम बंद बाबतचे बरेच प्रस्ताव असून ते अधिष्ठाता मंडळ आणि व्यवस्थापन परिषदेत ठेवण्यात येतील आणि मार्गदर्शक सूचनांप्रमाणे व्यवस्थापन परिषद निर्णय घेईल, असे सांगितले.

**श्री. सुधाकर तांबोळी** व **श्री. प्रदीप सावंत** यांनी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील गैरप्रकार रोखण्यासाठी सक्षम पाउले उचलत नाहीत असे ठाम प्रतिपादन केले; याच बरोबर श्री. तांबोळी यांनी संलग्नता विभाग, परीक्षा विभागांमध्ये योग्य त्या प्रकारे काम होत नसल्याने, हे प्रतिपादन केले; त्याचबरोबर या विभागांमधील मनुष्यबळाच्या संख्येबद्दल डॉ. सुप्रिया करंडे यांनी चिंता व्यक्त केली व विद्यापीठामध्ये निवृत्त कर्मचाऱ्यांच्या

जागेवर नवीन भरती होत नाही, या बाबीकडे सभेचे अधिक लक्ष वेधले. याच बरोबर या विभागांमध्ये व्यक्तिसापेक्ष मान्यता मिळणे आदी गैरप्रकार होतात, असे ठाम प्रतिपादन डॉ. सुप्रिया करंडे व श्री प्रदीप सावंत यांनी केले. या सर्व चर्चेतील मुद्द्यांबाबत श्री महादेव जगताप यांनी सहमती व्यक्त केली.

चर्चेत भाग घेत **डॉ. गुलाबराव राजे** यांनी सिद्धार्थ महाविद्यालयातील अनागोंदी कारभार, डॉ. बोस यांच्या नियुक्तीबाबत झालेल्या वादाचा उल्लेख केला याच बरोबर तक्रार निवारण समिती कडे पडून राहिलेल्या प्रकरणांबाबत होणाऱ्या दिरंगाईबद्दल मुद्दा मांडला, त्याचबरोबर प्रभारी प्राचार्य यांची मान्यता देताना त्या संदर्भात असणाऱ्या अधिनियमांची पायमल्ली होत असल्याचे व कित्येक वर्षे प्रभारी प्राचार्य महाविद्यालयात असणे या बाबींकडे सभागृहाचे लक्ष वेधले, यामध्ये वेंगुर्ला महाविद्यालयात पंधरा वर्ष प्रभारी प्राचार्य, देवगड महाविद्यालयातही सुमारे दोन-अडीच वर्षे प्रभारी प्राचार्य असणे ही गोष्ट नियमबाह्य आहे असे ठासून प्रतिपादन केले.

या चर्चेस उत्तर देताना प्र-कुलगुरू यांनी कारवाई करण्यामध्ये प्राध्यापकांचा वेतन विषयक प्रश्न उपस्थित होतो हा मुद्दा सभागृहास अवगत करून दिला. श्री. रविकांत सांगुर्डे व श्री संजय शेटे यांनी विद्यापीठाच्या आदर्श महाविद्यालयातही वेतन विषयक प्रश्न असल्याचे प्रतिपादन केले. याचबरोबर आयसीएल झुनझुनवाला, वाशी येथील महाविद्यालयातील श्री अमर कडाळे यांच्या प्रकरणाचा उल्लेख श्री. रविकांत सांगूर्डे यांनी केला. विद्यापीठाच्या दळवी कॉलेजमधील वेतनाच्या प्रकरणाबद्दल सविस्तर माहिती दिल्यास योग्य ती कारवाई करू तसेच श्री. अमर कडाळे यांचे प्रकरणावर तक्रार निवारण समितीस तातडीने निर्णय द्यावयास सांगितले, असे आश्वासन माननीय कुलगुरू यांनी सभागृहात दिले.

**प्रा. कुलकर्णी** यांनी संलग्न महाविद्यालयाद्वारे सलग्नतेच्या परिनियमांचे कशाप्रकारे उल्लंघन करण्यात येते, त्याबाबत मुद्दा उपस्थित केला व विभागातील कार्यपद्धती सुधारण्यासाठी एक समिती नेमून सखोल चौकशीची मागणी केली. कलम ९७(१) प्रमाणे प्रत्येक महाविद्यालयामध्ये महाविद्यालय विकास समितीचे गठन होत नसून विद्यापीठांकडून दुर्लक्ष होत असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

त्याबाबत खुलासा करताना प्र-कुलगुरू म्हणाले की, विद्यापीठ विभागांची पुनर्रचना करण्यात येत असून ही पुनर्रचना झाल्यावर संलग्नता विभागाने त्या शाखेच्या अधिष्ठाता यांच्याकडे या बाबी सुपूर्द करायच्या आहेत तसेच उल्लंघनाची प्रकरणे नजरेस आणून दिल्यास त्यावर कारवाई केली जाईल.

**श्री. महादेव जगताप** यांनी सोमय्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने विद्यापीठाची परवानगी न घेता प्रथम वर्ष प्रवेश बंद करून स्वतःच्या स्वायत्त विद्यापीठात प्रवेश सुरु केले; या बाबी सभागृहाच्या नजरेस आणून दिल्या. तसेच कायद्याप्रमाणे अभ्यासक्रम बंद करण्याची अभिप्रेत असलेली प्रक्रिया पार न पाडता व संलग्नता शुल्क न

भरता पुढील प्रक्रिया केल्याचे सभागृहाच्या नजरेस आणून दिले; विद्यापीठ कोणाच्या दबावाखाली कार्य करते आहे का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

**श्री. जगताप** यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला प्राध्यापक निशा मुनी यांनी अनुमोदन दिले व याआधीच्या अधिसभेत ही बाबही विद्यापीठाच्या नजरेस आणून दिली होती, हा संदर्भ दिला.

कुलसचिव यांनी सोमय्या महाविद्यालय संदर्भात खुलासा करताना सांगितले की, सदर व्यवस्थापनाने सप्टेंबर महिन्यात ठराव केला असून तक्रार प्राप्त होताच विद्यापीठाने खुलासा मागितला होता व त्यास व्यवस्थापनाने उत्तर देताना सांगितले की, त्यांनी महाविद्यालयाच्या व्यवस्थापन समितीमध्ये झालेल्या ठरावानुसार ते महाविद्यालय बंद केले आहे; परंतु विद्यापीठाने हा प्रस्ताव सदर शैक्षणिक वर्षासाठी मान्य केला नसून पुढील वर्षापासून तो मान्य केला आहे, असे सांगितले. या आशयाचे पत्रही त्यांना पाठवले आहे. यावर सर्व सभासदांनी तीव्र नापसंती व्यक्त करून सदरहू महाविद्यालयाने आधीच प्रवेश बंद केले आहेत, ही बाब विद्यापीठाच्या नजरेस आणून दिली.

हरकतीचा मुद्दा उपस्थित करत श्री. जगताप यांनी सोमय्या महाविद्यालयाने थांबवलेल्या प्रवेशाबद्दल विद्यापीठाने काय कारवाई केली? या प्रश्नाचे उत्तर अजूनही मिळाले नसल्याचा मुद्दा उपस्थित केला; या संदर्भात विद्यापीठाने अद्याप आपल्याकडे माहिती पोचली नसुन दिलेले उत्तर समाधानकारक नाही असे प्रतिपादन केले. यावर श्री. महादेव जगताप, श्री. राजन कोळंबेकर, श्री. प्रदीप सावंत यांनी या महाविद्यालयावर चौकशी समिती नेमावी व यामध्ये प्रवेश का झाला नाही तसेच द्वितीय वर्ष व तृतीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची काय परिस्थिती आहे? या प्रश्नांबाबत सखोल चौकशी झालीच पाहिजे, असा आग्रह धरला.

प्र-कुलगुरू यांनी या महाविद्यालयावर स्थानिक चौकशी समिती प्रवेश बंदच्या संदर्भात जाईलच असे प्रतिपादन केले व ती शैक्षणिक वर्ष 2021-22 साठी जाईल असे प्रतिपादन केले. इतर प्रकरणांबाबत चौकशीसाठी समिती पाठवणे हे कुलगुरू यांच्या अधिकारात असल्यामुळे ते निर्णय घेतील असे प्रतिपादन केले.

यावर याच वर्षापासून सदर महाविद्यालयाने प्रवेश बंद केले आहेत ही बाब सदस्यांनी सभागृहाच्या व प्र-कुलगुरूंच्या नजरेस आणून दिली यावर महाविद्यालयांकडून नियमांची पायमल्ली होत असल्याने विद्यापीठाकडे योग्य तो कायदेशीर सल्लागार नसल्याची बाब श्री. प्रविण पाटकर, डॉ. सुप्रिया करंडे व श्री. सुधाकर तांबोळी यांनी सभागृहाच्या नजरेस आणून दिली; यावर प्र-कुलगुरू यांनी कायदा अधिकारी नेमण्याची प्रक्रिया सुरू असून शासनाकडे त्याचा पाठपुरावा करत आहोत; परंतु याबाबत होणाऱ्या दिरंगाईबद्दल सदस्यांनी नाराजी व्यक्त करून शासनाकडे केलेला पाठपुरावा व त्या संदर्भातील कागदपत्रे सभासदांना सादर करावीत, अशीही मागणी केली.

**कुलसचिव** यांनी काही विद्यापीठांमध्ये उपकुलसचिव दर्जाचा अधिकारी हा विधी अधिकारी म्हणून कार्य करतो; परंतु मुंबई विद्यापीठामध्ये हे पद उपलब्ध नसल्याचे त्यांनी सांगितले जरी आपल्याकडे विधी अधिकारी असला तरी तो न्यायालयामध्ये विद्यापीठाची बाजू मांडण्यासाठी उभा राहू शकत नाही, अशी माहिती सभागृहात दिली.

यावर चर्चेत भाग घेताना श्री. प्रवीण पाटकर, डॉ. सुप्रिया करंडे, ॲड. वैभव थोरात यांनी विद्यापीठाकडे विधी तज्ञांचे मंडळ न्यायालयात बाजू मांडण्यासाठी उपलब्ध असले तरी त्यांना कायदेशीर गोष्टींबाबत सखोल माहिती देण्यासाठी विधी अधिकाऱ्यांची गरज आहे ही गोष्ट ठासून सांगितली. यावर कुलगुरू म्हणाले की, विधी अधिकारी हे पद निर्माण करणेबाबत शासनाकडे पत्रव्यवहार केला असून आपल्या सर्वांच्या सहकार्याची गरज आहे. हे पद मंजूर झाल्यावर तात्काळ विधी अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येईल, असे आश्वासन कुलगुरू यांनी सभागृहात दिले.

यावर प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी सोमय्या महाविद्यालयावर एकरूप परिनियम क्र. १ नुसार कारवाई होणार का? असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर निश्चितच उचित कार्यवाही होईल, असे आश्वासन प्र-कुलगुरू यांनी दिल्यानंतर स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती मा. कुलगुरुंनी यांनी केली असता त्यांच्या विनंतीस मान देऊन प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

सौ. शीतल शेठ-देवरुखकर यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस श्री. प्रदीप सावंत यांनी अनुमोदन दिले.

<u>२. स्थगन प्रस्ताव</u>

> विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ कायदा व परिनियमातील तरतुदींची पायमल्ली होणे, मनमानी कारभार होणे, विद्यार्थ्यांना अपुऱ्या पायाभूत सुविधा देणे, शिक्षकांच्या नेमणुकांमध्ये गैरप्रकार करणे, परीक्षांमध्ये गैरप्रकार करणे अशा दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या गैरप्रकारांमुळे विद्यापीठाची जागतिक स्तरावर बदनामी होत आहे व विद्यापीठाची पत घसरत आहे या अतिशय गंभीर विषयावर या सभागृहामध्ये सखोल चर्चा होऊन त्यावर त्वरित उपाययोजना होण्यासाठी ही बैठक स्थगित करण्याचा माझा हा स्थगन प्रस्ताव बैठकीच्या पटलावर घेण्यात यावा.

सौ. शीतल शेठ-देवरुखकर यांनी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांकडून मनमानी कारभार, विद्यापीठ कायदा व परीनियमांची पायमल्ली, संलग्नता, तिच्या अटी आणि शर्तींचा भंग व परीक्षांमध्ये होणारे गैरप्रकार हे प्रमुख मुद्दे मांडले व यावर विद्यापीठाचा कोणताही अंकुश नसल्याने विद्यापीठातील शिक्षणाचा दर्जा हा खालावत आहे व या संदर्भात वृत्त माध्यमातून विविध बातम्या वृत्ते प्रसिद्ध झाल्यामुळे विद्यापीठाची मानहानी होत

आहे; त्यामुळे दीडशे वर्षाची परंपरा असलेल्या विद्यापीठाची प्रतिमा समाजात मलिन होत आहे, असे प्रतिपादन केले; याचबरोबर विविध महाविद्यालयांमधील निकृष्ट दर्जाची उपहारगृहे तसेच विद्यार्थ्यांकडून घेतलेले सुविधा शुल्क व त्या प्रमाणात नसणाऱ्या सुविधा हा मुद्दा प्रामुख्याने मांडला. विशेषतः या महाविद्यालयांतून शिकणाऱ्या विद्यार्थिनींची होणारी कुचंबणा हाही मुद्दा प्रामुख्याने मांडला या सर्व गोष्टींसाठी संलग्नता विभाग व घटक महाविद्यालय विभाग यांची अकार्यक्षमता कारणीभूत असल्याचाही त्यांनी उल्लेख केला.

या विभागांच्या आतापर्यंत झालेल्या कारभाराची चौकशी करण्यासाठी व कार्यपद्धतीचे परीक्षण करण्यासाठी अधिसभा सदस्यांची समिती नेमावी, अशी मागणी त्यांनी केली.

या प्रस्तावास उत्तर देताना प्र-कुलगुरू यांनी प्रतिपादन केले की, प्रशासकीय सेवा सुधारण्यासाठी विद्यापीठातील विभागांचे पुनर्गठन करण्याची प्रक्रिया सुरु असून प्रशासकीय उणिवा सुधारण्याचा प्रयत्न सुरु आहे. संलग्नते संदर्भात विद्वत परिषद निर्णय घेते व योग्य त्या अटी घालूनच संलग्नीकरण याचे सलगीकरण होते, याचबरोबर कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी कार्य परीक्षण ही करून घेण्यात आलेले आहे व त्यानुसार या विभागांची पुनर्रचना करण्यात येत आहे. याच बरोबर त्यांनी विद्यापीठाची मानांकनेही सुधारत असल्याचे प्रतिपादन करून आपण एम सी क्यू 157 वरून 64 वर गेलो आहे. NRF रँकिंग ही सुधारली आहे, ही गोष्ट सभागृहाच्या नजरेस आणून दिली.

**डॉ. सुप्रिया करंडे** यांनी यावर महाविद्यालयांची मुजोरी कशी वाढत आहे याचे विवेचन केले व या प्रकाराने विद्यापीठाचे सर्व नियंत्रण महाविद्यालयावरून जर असे सुटत गेल्यास विद्यापीठाचे अस्तित्व फक्त गुणपत्रिका व पदवी छपाई करणे एवढ्याच गोष्टींसाठी राहील, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. हे सर्व टाळण्यासाठी कायदेशीर बाजू मांडणारी समिती जास्त मजबूत असली पाहिजे व या महाविद्यालयांमधील होणाऱ्या गैरप्रकारांची चौकशी करण्यासाठी अधिसभा सदस्यांची समिती नेमण्यात यावी, असे ठाम प्रतिपादन केले.

**श्री. महादेव जगताप** यांनी सत्र शुल्क भरण्यासाठी महाविद्यालये विद्यार्थ्यांना कशाप्रकारे त्रास देतात यांची उदाहरणे दिली व विद्यापीठाची आदरयुक्त भीती ही महाविद्यालयांना वाटली पाहिजे यासाठी विद्यापीठाने गरज असल्यास मुजोर महाविद्यालयांवर कठोर कारवाई केली पाहिजे, असे प्रतिपादन केले.

या सर्व गोष्टींबाबत सहमती व्यक्त करून डॉ. गुलाबराव राजे यांनी सभागृहासमोर विद्यार्थ्यांच्या नोंदणी गुणोत्तरासंदर्भात आकडेवारी सादर केली. त्या आकडेवारीनुसार 36% हा विज्ञान शाखेमध्ये तर 37% वाणिज्य शाखेमध्ये व 47% ते 58 % हे गळतीचे प्रमाण आहे, ही माहिती सभागृहाच्या निदर्शनास आणली.

श्री. प्रदीप सावंत यांनी मिठीबाई महाविद्यालयाच्या उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत समाधानकारक उत्तर नसल्याची बाब नजरेस आणली. यावर खुलासा करताना संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी विद्यार्थ्यांची

तक्रार आल्यानंतर आपण विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनांनुसार महाविद्यालयाने त्यांची परीक्षा पद्धती बदला, अशा सूचना महाविद्यालयाकडे पाठवल्या आहेत; द्वितीय व तृतीय वर्षासाठी त्यांची प्रणाली त्यांनी बदलली आहे, असा खुलासा केला. तसेच सदरहू महाविद्यालयास त्यांनी लावलेला परीक्षेचा निकाल हा विद्यापीठाच्या पत्रानुसार नाही यावर त्यांचे स्पष्टीकरणही मागवले आहे, असा खुलासा केला.

या मुद्द्यावर चर्चा करताना सौ. शीतल शेठ-देवरुखकर यांनी बऱ्याच महाविद्यालयाच्या तक्रारी असून संलग्नता विभाग व महाविद्यालयीन शिक्षक मान्यता विभाग आपली भूमिका योग्य प्रकारे निभावत नसल्यामुळे ही प्रकरणे उभी राहतात, असे प्रतिपादन करून अधिसभेतील सदस्यांची या सर्व बाबींची छाननी करण्यासाठी समिती गठीत करावी, अशी मागणी केली. त्याचबरोबर त्यांनी मित्तल महाविद्यालय मालाड यांचा उल्लेख केला; विद्यापीठाला दिलेली माहिती किती खोटी असून सदरहू महाविद्यालयाला महानगरपालिका तसेच पोलीस उपायुक्त यांनी कारवाईचे पत्र देऊन कारवाई केल्यामुळे महाविद्यालयाने कोरोना संक्रमण काळामध्ये प्राध्यापकांना महाविद्यालयात बोलावणे बंद केले. याबाबतीत समर्थन देत श्री. पाटकर यांनी महाविद्यालयासाठी स्थानिक चौकशी समिती गठित करताना अधिसभेमधील पदवीधर मतदार संघातील सदस्यांचा समावेश केला जात नाही, असा मुद्दा उपस्थित केला.

श्री. शशिकांत झोरे यांनी संलग्नता विभाग व महाविद्यालयीन शिक्षक मान्यता विभाग आपले कार्य योग्य त्या प्रकाराने करत नसल्याचाही उल्लेख केला, याचबरोबर अपात्र प्राध्यापकांनाही मान्यता पत्र देण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले व त्यांनी भवन्स महाविद्यालयामधील प्राध्यापक शीतल वरभे यांच्या नियुक्तीचा उल्लेख केला.

या मुद्द्यावर आपल्या तीव्र भावना व्यक्त करताना श्री. सुधाकर तांबोळी यांनी केवळ संलग्नता विभाग व महाविद्यालयीन शिक्षक मान्यता विभाग यांची अकार्यक्षमता उघडकीस येते आहे, असे नसून परीक्षा विभागातही कित्येक गैरप्रकार चाललेले आहे, हा मुद्दा मांडला व आपण हे गैरप्रकार वारंवार प्रशासनाच्या नजरेस आणून देऊन सुद्धा त्यावर कारवाई झालेली नाही, याबद्दल नाराजी व्यक्त करून महाविद्यालयीन शिक्षक मान्यता विभाग व संलग्नता विभागाच्या परीक्षणासाठी अधिसभा सदस्यांची समिती गठीत करावी, या सौ.शितल शेठ देवरुखकर यांच्या मागणीस त्यांनी पाठिंबा व्यक्त केला.

कुलगुरू यांनी ही बाब आपण समजून घेऊ तसेच लेखी स्वरूपात सदस्यांकडून तक्रारी आल्यास त्या तक्रारीनुसार आवश्यक असल्यास समिती गठन करण्याबाबत आपण निर्णय घेऊ, असे आश्वासन सभागृहात सदस्यांना दिले.

परंतु या आश्वासनाबाबत नाराजी व्यक्त करताना महाविद्यालयांकडून झालेले उल्लंघन हे प्रश्नांना दिलेल्या लेखी उत्तरांमध्येच अधोरेखित झाले आहे, ही भूमिका श्री. प्रदीप सावंत, श्री. शशिकांत झोरे, श्री. सुधाकर तांबोळी, सौ. शीतल शेठ-देवरुखकर व प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी मांडली.

माननीय कुलगुरूंच्या या आश्वासनावर आपली तीव्र नाराजी व्यक्त करत सौ. शीतल शेठ-देवरुखकर यांनी कुलगुरूंच्या विनंतीला प्रतिसाद देत स्थगन प्रस्ताव मागे घेतला; परंतु त्याच बरोबर कुलगुरू आपली मागणी गांभीर्याने घेत नसल्यामुळे व टोलवाटोलवीची भूमिका घेत आहेत असे प्रतिपादन करून सौ. शीतल शेठ-देवरुखकर यांनी सभात्याग केला.

श्री. मिलिंद साटम यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस श्री. प्रदीप सावंत यांनी अनुमोदन दिले.

<u>३. स्थगन प्रस्ताव</u>

कोकणामध्ये अधिकाधिक नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याची गरज आहे. त्यानुसार कोकणातील उपकेंद्रे अधिक सक्षम करून तेथील परिस्थितीला अनुकूल असे अभ्यासक्रम तयार करावे.

<u>४. स्थगन प्रस्ताव</u>

पालघर येथे मुंबई विद्यापीठ नवीन उपकेंद्र सुरू करणार आहे तरी त्या ठिकाणी स्पोर्टसाठी रेसिडेंस बेसिस वर स्पोर्ट्स कॉलेज व त्यांच्याशी निगडीत अभ्यासक्रम सुरू करण्यात यावे.

श्री मिलिंद साटम यांनी आपल्या स्थगन प्रस्तावासंदर्भात आपली भूमिका मांडताना कोकण विभागासाठी कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम ज्यामध्ये ग्रामीण व्यवस्थापन, पर्यटन याचबरोबर शेतीविषयक विविध अभ्यासक्रम करण्याची गरज आहे, हे प्रामुख्याने सांगितले.

यासंदर्भात विद्यापीठाची भूमिका विशद करताना प्र-कुलगुरू यांनी यासंदर्भात कार्यवाही सुरू केली असून यासंदर्भातील प्रस्ताव महाराष्ट्र सरकारला सादर करण्यासाठी सिंधुदुर्गमध्ये प्राचार्य डॉ.कुऱ्हाडे आणि प्रा.भारमल आणि पालघर मध्ये प्राचार्य डॉ.कुऱ्हाडे आणि डॉ.फडके यांची समिती गठीत केली आहे व त्यांचे प्रस्तावही आले आहे; सिंधुदुर्ग व रत्नागिरी या विभागांचा दौरा माननीय कुलगुरू यांच्या नेतृत्वाखाली चारही विद्याशाखांचे अधिष्ठाता यांनी केला आहे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विद्यापीठ परिसरामध्ये विशेषत: सामुद्री विज्ञान व त्या अनुषंगाने कौशल्य विकसित करण्यासाठी पाण्याखालील जैवसृष्टी जीव वैविध्य; अभियांत्रिकी शेतीविषयक तंत्रज्ञान ज्यात प्रामुख्याने काजू, आंबा, फणस व शेवगा यासारख्या फळांवर/भाज्यांवर प्रक्रिया, विज्ञान तसेच नाट्यशास्त्र व आरोग्य विषयक अभ्यासक्रम हे सुरु करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. तसेच चलचित्र विषयक तंत्रज्ञानाशी संबंधित अभ्यासक्रम या जिल्ह्यांमध्ये सुरू करण्याचा प्रयत्नही विद्यापीठ करणार आहे, अशी माहिती दिली.

यासंदर्भात श्री.प्रदीप सावंत यांनी आदर्श महाविद्यालयांची कामे अर्धवट राहिली असून प्रामुख्याने मंडणगड येथील ग्रामस्थांनी आपली जमीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी दिली आहे.

यावर माननीय कुलगुरू यांनी यासंदर्भात रुसा कडून अनुदान मिळण्याची अपेक्षा आहे व त्यातून बऱ्याच गोष्टी शक्य होतील, हे प्रतिपादन करून नुकत्याच झालेल्या वादळामुळे ज्या महाविद्यालयांचे नुकसान झाले आहे; यासंदर्भातही आढावा घेऊन मंत्रीमहोदयाकडून मदत मिळवण्याचाही प्रयत्न सुरु आहे, ही माहिती सभागृहात दिली. यासंदर्भात सर्व सभासदांनी आपण या कामी विद्यापीठास सहकार्य करू, अशी भावना व्यक्त केली.

मा. कुलगुरूंनी श्री. मिलिंद साटम यांना त्यांचे स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली असता लवकरच नवीन चित्र बघण्यास मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करून श्री. मिलिंद साटम यांनी त्यांचे स्थगन प्रस्ताव मागे घेतले.

श्री. सुधाकर तांबोळी यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव एकत्रितरित्या मांडला व त्यांस डॉ. सुप्रिया करंडे यांनी अनुमोदन दिले.

५. स्थगन प्रस्ताव

मुंबई विद्यापीठात जो गुणवंत कर्मचारी पुरस्कार दिला जातो त्याचा निकष काय असतो? आणि गुणवंत कर्मचारी याचा अर्थ समजावा?

६. स्थगन प्रस्ताव

MKCL आणि CCF यांच्याकडून विद्यार्थ्यांच्या अडचणी-प्रश्न सोडवले जातात का?

७. स्थगन प्रस्ताव

अंतिम वर्षाच्या परीक्षेसंदर्भात गेल्या ५ महिन्यात मुंबई विद्यापीठाकडून विद्यार्थी-पालक यांच्या मनात असलेल्या प्रश्नांचे निरासन केले गेले का?

८. स्थगन प्रस्ताव

मुंबई विद्यापीठाच्या बोगस डिग्र्यासंदर्भात?

श्री. सुधाकर तांबोळी यांनी एमकेसीएल व विद्यापीठाचे अंतर्गत विभाग यामध्ये ताळमेळ नसल्याचे प्रामुख्याने सांगितले; एमकेसीएल हे विद्यापीठासाठी उपयुक्त नाही हे सांगताना त्यांनी एमकेसीएलबाबत विद्यार्थ्यांना आलेले विदारक अनुभव कथन केले. याचबरोबर एमकेसीएल जर PNR अंक विद्यार्थ्यांसाठी उपयोजित करत असेल तर वारंवार विद्यार्थ्यांना विद्यापीठात का चकरा माराव्या लागतात? हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला; त्याचबरोबर CCF विभागात पूर्णवेळ संचालक अजून विद्यापीठाने नेमला नाही, याकडे त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले;

एमकेसीएलच्या अनागोंदी कारभारामुळे प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया ही विद्यार्थ्यांसाठी क्लेशकारक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

श्री. सुधाकर तांबोळी यांना अनुमोदन देताना डॉ. सुप्रिया करंडे यांनी एमकेसीएल हा मुंबई विद्यापीठाशी संबंधित तयार झालेला विद्यार्थ्यांची माहिती (data) विद्यापीठास देण्यास तयार नाही आहे; याच बरोबर एमकेसीएलची हकालपट्टी करून विद्यापीठाने आपल्या विद्यार्थ्यांचे विदासंग्रह स्वतः तयार करावेत व त्यांचे व्यवस्थापन करावे, अशी सूचनावजा मागणी केली.

याबाबत झालेल्या चर्चेत भाग घेताना श्री. प्रदीप सावंत यांनी नवीन अभ्यासक्रम जे सुरू झाले आहेत यांची नोंदणी एमकेसीएल यांनी अद्यावत न केल्यामुळे कोकणातील विद्यार्थी या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकले नाही, ही वस्तुस्थिती सभागृहास अवगत केली. चर्चेमध्ये भाग घेताना दूरस्थ शिक्षण संस्थेमध्ये असणारे सुविधा केंद्र व आभासी वर्ग या सुविधाही दुरावस्थेत आहेत; याकडे प्रा. सुरेश मैंद यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. एमकेसीएल बद्दल आपला रोष व्यक्त करून श्री. महादेव जगताप यांनी आयुष नावाच्या नवीन प्रणालीकडे सभागृहाचे लक्ष वेधले; तसेच या प्रणाली मध्ये येणारा खर्चही एमकेसीएल पेक्षा खूपच कमी असतो आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले व ही प्रणाली विद्यापीठाने स्विकारावी, अशी विनंतीवजा सूचना केली.

या सर्व चर्चेचा गोषवारा श्री. तांबोळी यांनी घेतला व त्यांनी CCF विभागातील सुरक्षा व्यवस्थेत सुधारणा व्हावी, असे प्रतिपादन केले.

या सर्व चर्चेला विद्यापीठाच्या वतीने उत्तर देताना कुलसचिव यांनी सांगितले की, एमकेसीएल ही २००७ यावर्षी महाराष्ट्र शासनाने सर्व विद्यापीठांना अनिवार्य केली; त्यामुळे मुंबई विद्यापीठानेही एमकेसीएलची प्रणाली स्वीकारली; एमकेसीएल ₹ ५०/- मात्र प्रति विद्यार्थी शुल्क घेते; एमकेसीएलकडे विद्यार्थ्यांची माहिती ही प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष परीक्षा या महाविद्यालयीन स्तरावर होत असल्यामुळे महाविद्यालयाने प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष याची माहिती एमकेसीएल प्रणालीत सादर केल्याशिवाय सलग तीन वर्षांचा निकाल हा उपलब्ध होऊ शकत नाही; परंतु एमकेसीएल प्रवेश प्रक्रिया सुरू होण्याआधी आपल्या प्रणालीच्या आज्ञावलीत योग्य ते बदल करते व केलेले बदल विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण शिबिराद्वारे समजावून सांगते; याचबरोबर एमकेसीएल तसेच विद्यापीठाचा सीसीएफ विभाग यांच्या बैठका होत असतात व यात माहितीची देवाण-घेवाण होते. त्यामुळे सभासदांची जी भावना आहे विद्यापीठाचे एमकेसीएल बरोबर सहकार्य होत नाही; ही भावना अनुचित आहे. प्रवेश प्रक्रियेसाठीची संकेत स्थळ आता सुरु झाली आहे व योग्य वाटल्यास या संकेत स्थळाची मुदतही वाढवण्यात येईल; याच बरोबर CCF संचालक हे पद बदलून माहिती तंत्रज्ञान संचालक केले गेले आहे यासाठी CCF हा विभाग एकत्रित केल्याने माहिती तंत्रज्ञान वापरा बद्दलचे परीक्षण करून पुढील एकत्रित निर्णय घेण्यात येत आहेत.

श्री. महादेव जगताप यांनी केलेल्या सूचनेला उत्तर देताना कुलसचिव यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाने दिलेल्या आदेशात एकत्रित व्यवस्था प्रणाली उपयोजित उपयोग करण्याच्या सूचना दिल्या; त्यामध्ये प्रति विद्यार्थी ₹ ३२/- इतके शुल्क मोजावे लागणार आहे तसेच महाविद्यालयांना सरसकट ₹१८,०००/- शुल्क भरावे लागणार आहे; परंतु अजूनही या प्रणालीत परिपक्वता न आल्यामुळे ती अजून सुरू करण्यात आली नाही.

श्री.सुधाकर तांबोळी यांनी मांडलेल्या प्रश्नांबाबत कुलसचिव यांनी खुलासा केला की, CCF विभागात आता सुरक्षितेच्या दृष्टीने C.C.T.V. प्रणाली लावण्यात आली आहे त्याच बरोबर निकाल घेण्यासाठी जे विद्यार्थी येतात त्यांना इमारतीमध्ये वेगळी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे व ही योजना लवकरच कार्यान्वित करण्यात येईल. बोगस पदवी प्रकरणांमध्ये ४५ प्रकरणे उघडकीला आली होती, त्या संदर्भातील गुन्ह्यांची नोंदणी बीकेसी पोलिस स्टेशन येथे करण्यात आली; त्यासंदर्भात पोलीस जी माहिती सांगतील त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल. विद्यापीठ या प्रकरणांमध्ये संवेदनशील आहे, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

या माहितीवर आपली प्रतिक्रिया देताना श्री. प्रदीप सावंत यांनी एमकेसीएल प्रणाली बद्दल चर्चा करून या सर्व प्रणाली बद्दल तसेच विद्यापीठाने काढलेल्या परिपत्रकामुळे उद्भ्वणाऱ्या उद्भवणाऱ्या विसंगतीवरही त्यांनी बोट ठेवले.

वरील सर्व स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती मा. कुलगुरुंनी श्री. सुधाकर तांबोळी यांना केली असता चर्चेमध्ये आलेले मुद्दे व सभासदांची मते विचारात घेऊन व या त्रुटी दूर केल्या जातील, अशी आशा व्यक्त करुन तसेच मा. कुलगुरुंनी केलेल्या विनंतीस मान देऊन श्री. सुधाकर तांबोळी यांनी त्यांचे प्रस्ताव मागे घेतले.

डॉ. संगीता पवार यांनी खालीलप्रमाणे त्यांचे स्थगन प्रस्ताव मांडले व त्यास सौ. शीतल शेठ-देवरुखकर यांनी अनुमोदन दिले.

**<u>९. स्थगन प्रस्ताव</u>**

This online senate scheduled on 25th August 2020 at 1pm is organised very hurriedly. The Covid 19 pandemic is not contained so far and the virus cases are sited everyday. There is lot of misrepresentation of GR, circulars from the University of Mumbai hence calling teachers of University departments, colleges; non-teaching staff physically on duty few days in a month has not achieved any output when parallel online teaching through work from home is going on. This approach of the University towards teachers and staff is not good as the risk of teachers and staff getting contracted with the virus during travel and exposure to outside environment is high. Similarly recognising efforts of temporary security guards who have done their duty risking their life during the severity of pandemic outbreak times and are neglected with motivational allowance or any monetary benefits and rewards or appreciation and therefore the senate meeting be adjourned for 10 minutes.

## १०. स्थगन प्रस्ताव

This senate meeting be adjourned for 10 minutes as I want to show my displeasure on indecisive culture of University administration on issues of University departments which are severe in nature related to online admission, online teaching, results, developing uniform portal for accepting fees, aiding students who may not have access to digital technology, appointment of ad-hoc teachers for the academic year 2020-2021 (following reservation norms in appointing adhoc teachers) or allowing appointment of visiting teachers, steps to be taken for conducting exams of semester 3 students in the first half of academic year, finalising screening of CAS files of stage 1 to 2 and 2 to 3 as online process will be easier. Deans, Board of Exam and Board of Studies back up plans for the next half of the year.

डॉ. संगिता पवार यांनी विद्यापीठ शिक्षकांचे ऑनलाईन शिकवणी सुरु असताना त्यांना कोरोना काळात कामावर बोलावले जाते याबद्दल नाराजी व्यक्त केली. तात्पुरत्या सुरक्षा रक्षकांनी महामारीच्या उद्रेकात आपले जीवन धोक्यात घालून काम केले त्याबद्दल त्यांना प्रोत्साहन म्हणून काही लाभ देण्यात आला पाहिजे, अशी सूचना केली. निकाल, कॅस प्रक्रिया १ ते २, २ ते ३ कशा स्पीड अप करता येतील, असे मुद्दे उपस्थित केले.

मा. कुलगुरू यांनी वरिल सूचनांचा सकारात्मक विचार करण्यात येईल व कॅस प्रक्रिया स्पीड अप करण्यात येईल असे सांगून डॉ. संगीता पवार यांना त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली असता त्यांच्या विनंतीस मान देऊन डॉ. संगीता पवार यांनी त्यांचे स्थगन प्रस्ताव मागे घेतले.

श्री. महादेव जगताप यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस श्री. राजन कोळंबेकर यांनी अनुमोदन दिले.

## ११. स्थगन प्रस्ताव

मुंबई विद्यापीठात पारदर्शक कारभार होणेबाबतचा स्थगन प्रस्तावाबाबत.

**श्री. महादेव जगताप** यांनी मुंबई विद्यापीठातील पारदर्शक कारभार करण्याबाबत प्रस्तावात सांगितले की, महाविद्यालयांतील अभ्यासक्रम बंद करण्याऱ्या समितीची कार्यवाही झालेली नसून बऱ्याच महाविद्यालयांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत; अस्थायी कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी विद्यापीठाकडून वेळेत भरला जात नाही; एस के सोमय्या महाविद्यालयाने विद्यापीठाची परवानगी न घेता अभ्यासक्रम बंद केल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला;बऱ्याचशा महाविद्यालयांचे प्राचार्य अधिसभा सदस्यांना भेट देत नाहीत याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

प्र-कुलगुरू यांनी सांगितले की, क्लोझर कमिटीची कार्यवाही लवकरच केली जाईल; अस्थायी कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी नियमित वेळेत भरण्यात येईल व एस के सोमय्या महाविद्यालयाचा अभ्यासक्रम बंद करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली नाही.

**कुलगुरूंनी** श्री. महादेव जगताप यांना त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली असता, कुलगुरुंच्या विनंतीस मान देऊन श्री. महादेव जगताप यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

**डॉ. गुलाबराव राजे** यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस प्राचार्य मोहम्मद ताहीर यांनी अनुमोदन दिले.

**१२. स्थगन प्रस्ताव**

"This Motion is moved to invite urgent attention of the House to discuss the adverse impact of the Pandemic on higher education on the one hand and on the other hand the increasing divergence between goals of National Education Policy (NEP) 2020 and insufficient funding leading to severe compromise with access to quality education under jurisdiction of University of Mumbai."

**डॉ. गुलाबराव राजे** यांनी उच्च शिक्षणावर कोरोना महामारीचा दुष्परिणाम आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० च्या उद्दिष्टांमधील वाढती तफावत, आर्थिक निधींच्या तुटवड्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या दर्जेदार शिक्षणाबाबत होणारी तडजोड याबाबत सविस्तर विश्लेषण केले.

याबाबत सकारात्मक विचार करण्यात येवून त्रुटी दूर करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील असे सांगून मा. कुलगुरूंनी डॉ. गुलाबराव राजे यांना त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली असता कुलगुरुंच्या विनंतीस मान देऊन डॉ. गुलाबराव राजे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

**बाब क्र. ३ : विद्यापीठाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३७(i) अन्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता वार्षिक बृहत आराखडा शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता वार्षिक बृहत आराखड्याचा मसुदा मा. प्र-कुलगुरू यांनी अधिसभेत सादर केला. त्यास ॲड. निल हेळेकर यांनी अनुमोदन दिले.

वार्षिक बृहत आराखड्यातील महविद्यालय बिंदु संदर्भात सविस्तर चर्चा झाली व सर्व सदस्यांनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांच्या सूचना दिल्या. सदस्यांच्या सूचनांची दखल घेऊन सर्वानुमते खालील ठराव पारित करण्यात आला.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम ३७(i) व कलम १०७(५) नुसार विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता वार्षिक बृहत आराखड्याचा मसुदा तयार करण्याकरिता अधिष्ठाता मंडळाने सुचविल्यानुसार मुंबई विद्यापीठ परिक्षेत्रातील जिल्ह्यामध्ये नवीन महाविद्यालयास बिंदू उपलब्धतेचा शिफारशींचा मसुदा दिनांक २६ जून, २०२० रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीमध्ये, अधिष्ठाता मंडळाच्या शिफारशींसह दिनांक २९ जून, २०२० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये बाब क्र.२ व व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशींसह दिनांक २३ जुलै, २०२० रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत बाब क्र.२ अन्वये त्यांच्या शिफारशींसह पारित झाल्यानंतर अधिसभेत ठेवण्यात आला. सदर बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली व शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिताची वार्षिक योजना 'परिशिष्ट-अ' प्रमाणे अधिसभेच्या मंजुरीसह शासनास सादर करण्याची शिफारस करण्यात आली. सोबत वार्षिक योजनेचे 'परिशिष्ट-अ' जोडले आहे.

परिशिष्ट - अ

## Proposed Annual Plan for Academic Year 2021-22

| District | Taluka | Location If Applicable | Arts Commerce Science | Law | Night College Arts Commerce Science | Bsc Hosp. Studies | BSW | B.Ed. | Physical Education | Sports College | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Mumbai City | Dadar | Dadar (west) Previous point | ----- | ---- | 01 | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | **South Mumbai** | - | ----- | **01** (Three Year) | ------ | ----- | ----- | ----- | ----- | ----- | **01** |
| Mumbai Sub urban | Bandra | Khairvadi, Bandra(E) Previous Point | 01 | ----- | ------ | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | Malad | Malad (West) | 01 | ----- | ------- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | **Borivali** | ----- | ----- | ----- | ----- | **01** | ----- | ----- | ----- | ----- | **01** |
| Thane | Thane | Mira Road | ------ | ----- | ------- | 01 | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | **Thane** | **Ghodbandar Road** | **01** | | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | **01** |
| | **Bhiwandi** | ----- | ----- | ----- | ----- | **01** | ----- | ----- | ----- | ----- | **01** |
| | Ulasnagar | ------- | ------- | ----- | 01 | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | Kalyan | Titwala | 01 | ----- | ------ | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | **(Kalyan Gramin)** | ----- | ----- | ----- | ----- | ----- | **01** | ----- | ----- | ----- | **01** |
| | **Kalyan/ Dombiwali** | ----- | ----- | **01** | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | **01** |
| | Shahapur | ----- | 01 | 01 | ----- | ----- | ----- | ----- | 01 | ----- | 03 |
| Raigad | Kamothe | ----- | ----- | ----- | 01 | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | **Karjat** | ------- | **01** | ---- | ------ | ----- | ----- | ----- | ----- | ----- | **01** |
| Ratnagiri | Ratnagiri | Watad Village,Khandal | 01 | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | **Dapoli** | ----- | ----- | ----- | ----- | ----- | **01** | **01** (Three year integrated) | ----- | ----- | **02** |
| | **Khed** | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 | ----- | ----- | ----- | 01 |
| | **Rajapur** | ------- | ----- | **01** | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | **01** |
| | Ratnagiri | ------- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 | 01 |

| District | Taluka | Location If Applicable | Arts Commerce Science | Law | Night College Arts Commerce Science | Bsc Hosp. Studies | BSW | B.Ed. (Three year integrated) | Physical Education | Sports College | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sindhudurg | Kudal | Pat | 01 | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | Kankavali | Osargaon | 01 | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | Kankavali | Varawade | 01 | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | **Kankavali** | ----- | ----- | **01** | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | **01** |
| | Nandgaon | Asalade | 01 | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | **Vijaydurg** | ----- | **01** | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | **Malvan** | ---- | ----- | ----- | ------ | **01** | ----- | ------ | ----- | | **01** |
| | ------- | ------- | | | | | **01** | | | | **01** |
| Palghar | Palghar | Lalonde/ Safala | 01 | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | Vasai | Naygaon (East) | ------ | ----- | ----- | 01 | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | Vikramgad | Suksale | 01 | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | Nalasopara (East) | ----- | 01 | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | 01 |
| | **Dahanu** | **Kosbad** | **01** | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | ----- | **01** |
| Total | ---- | ----- | 16 | 05 | 03 | 05 | 04 | 01 | 01 | 01 | 36 |

सभेमध्ये सक्रीय सहभाग घेतल्याबद्दल सर्व उपस्थित सदस्यांचे त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मा. कुलगुरूंनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

कुलसचिवांनी उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करून मा. अध्यक्षांच्यावतीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

कुलसचिव (प्र)
मुंबई विद्यापीठ